09 TO 15 NOV 2020 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 07/11/2020 8:37 PM Page 1

C M Y K

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ८ अंक : ४७ सोमवार दि. ०९ नोव्हेंबर २०२० ते रविवार दि. १५ नोव्हेंबर २०२० पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## माजी महापौरांच्या कुटुंबावर घातला नियतीने घाला मोठ्या मुलाच्या वाढदिवशीच धाकट्याचा खून झाला



जळगाव/क्राईम रिपोर्टर

खरेच नियती मोठी विचित्र असते. तिच्या मनात काय लपलेलं आहे याची कुणालाही कल्पना नसते. त्यामुळे कधी कोणत्याक्षणी काय घडेल आणि होत्याच नव्हत होईल याचा नेम नसतो. तसे पाहता माणसाच्या जीवनाचा भरोसा नसतो. आता या क्षणी कुटुंबाच्या किंवा मित्रांच्या सोबत हसत खेळत असलेला एखादा माणूस हार्टअॅटेक येऊन मारतो आणि क्षणात आनंद सोहळ्याचे रुपांतर शोक सागरात होते. देवदर्शनासाठी उत्साहात निघालेल्या भाविकांच्या गाडीला अपघात होऊन ते काळाच्या जबड्यात सामावले जातात आणि हे सगळ अर्थातच नियती घडवत असते जी माणसाला दिसत नसली तरी अदृश्य रूपाने माणसाचा पाठलाग करीत असते आणि नियतीच्या या खेळापुढे कुणाचेही काही चालत नाही. कारण कपाळावरील कर्माच्या रेषेवर विधात्याने रेखाटलेले माणसाचे भविष्य त्याने स्वतःहून कपाळमोक्ष केला तरी त्याला बदलता येत नाही. कारण ज्या वेळेला जे घडणार आहे ते घडणारच!








जळगावचे माजी महापौर अशोक सपकाळे यांच्या मुलांच्या बाबतीतही असेच घडले. ज्या दिवशी थोरल्या मुलाचा वाढदिवस होता त्याचदिवशी धाकट्या मुलाची हत्या झाली. त्यामुळे सपकाळे कुटुंबावर दुखाचा डोंगर कोसळला आहे. या प्रकरणी सर्व आरोपींना अटक करण्यात आली. मोटार सायकल ओव्हरटेक करण्याच्या शुल्लक वादातून सपकाळे यांच्या तीन नंबर मुलाचा काही तरुणांशी वाद झाला. या वादात महापौरांच्या मुलाला मारहाण करताना त्याच्या दोन नंबर



भावाने पाहिले आणि तो भावाला वाचवायला गेला आणि जीव गमावून बसला.

अशोक सपकाळे हे जळगावच्या राजकीय पटलावरील नाव जळगाव शहरवासीयांना चांगल्याप्रकारे ...पान २ वर

## अनैतिक संबंध चव्हाट्यावर आले संतप्त पतीने पत्नीलाच ठार केले

भिवंडी/क्राईम रिपोर्टर

कोणत्याही पतीला त्याच्या पत्नीमुळे मान खाली घालावी लागली, तर समाजात त्याची बदनामी होते. अशावेळी एकतर तो पत्नीला संपवतो किंवा मग स्वतःचे जीवन संपवतो. भिवंडीत एका विवाहित महिलेचे दुसऱ्या पुरुषाशी अनैतिक संबंध होते आणि या संबंधांची पतीला कूण कूण लागली होती. त्यामुळे पती अस्वस्थ झाला होता. त्यातच ज्याच्याशी तिचे अनैतिक संबंध होते त्याच्या बरोबरच तिचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यामुळे तिच्या पतीची आणि त्याच्या कुटुंबियांची समाजात खूपच बदनामी झाली होती. त्यामुळे चिडलेल्या पतीने पत्नीची भोसकून निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी पतीला अटक केली आहे. या घटनेमुळे भिवंडीत मोठी खळबळ माजली आहे.

भिवंडी शहरातील शांतीनगर परिसरातील अन्सार नगर येथे बहिणी च्या घरी राहायला आलेल्या पत्नीची अनैतिक संबंधातून पतीने निर्घृण हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. भिवंडी शहरातील अन्सार नगर भागात घडली आहे. नसरीन रफिक खान (वय ३८) असे हत्या झालेल्या पत्नी चे नाव असून पती रफिक खान (वय ५०) यास शांतीनगर पोलिसांनी अटक केली आहे. पत्नी नसरीन हिचे दोन वर्षांपासून एक परपुरुषा सोबत अनैतिक संबंध असल्याची कुणकुण पती रफिक यांच्यात भांडण सुरू होते. त्यातच पत्नी चे सद्दाम या परपुरुषा सोबत नग्नावस्थेतील व्हिडीओ क्लिप परिसरात व्हायरल झाल्याने आपली बेअब्रू झाल्याने त्याचा राग मनात धरून पत्नी बहीण आयशा तौफिक सय्यद हिच्या घरी आली असता पती रफिक याने तिच्या घरी येऊन पत्नी च्या पोटावर हातावर धारदार शस्त्राने वार करून पत्नी ची हत्या केली.या घटनेची माहिती मिळताच स्थानिक शांतीनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपी पती रफिक याला पोलिसांनी अटक केली असून सध्या शांतीनगर पोलीस या संपूर्ण घटनेचा तपास करीत आहेत.

## अर्जुन बाबर भयंकर सुडाने पेटला भावाच्या हत्येचा त्याने बदला घेतला



मयत अक्षय भोसले



आरोपी मदन कदम

इस्लामपूर/क्राईम रिपोर्टर

खून का बदल खून हे केवळ सिनेमामध्येच बघायला मिळते असे नाही, तर माणसाच्या प्रत्यक्ष जीवनात सुद्धा अशा गोष्टी घडतात आणि शेवटी काय तर समाजात ज्या काही गोष्टी घडत असतात त्याच नाटक सिनेमात दाखवल्या जातात आणि सुडाची परंपरा हि काही आजकालची नाही, अगदी पुरातन काळापासून आहे. रामायण, महाभारत या महाकाव्यांचा केंद्रबिंदू सुद्धा सूड हाच आहे. जगात असे एकही क्षेत्र नाही जिथे द्वेष मत्सर इर्षा आणि त्यातून निर्माण झालेली सूड भावना नाही आणि सुडाने पेटलेला माणूस डूख धरून असतो, तो कधी ना कधी सूड घेतोच. भावाचा खुनी तुरुंगातून सुटून आल्याचे समजताच सुडाने पेटलेल्या भावाने अत्यंत योजनाबद्धरित्या त्याची हत्या केली आणि भावाच्या हत्येचा सूड घेतला. या प्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केली असून तिघे फरार आहेत.

मूळचा अक्षय भोसले हा इस्लामपूर जवळील वाळावा तालुक्यातील उरणवाडी येथील होता. परंतु तो गेल्या आठ दहा वर्षापासून तो ठाणे येथे राहयला गेला होता.तेथे तो आपल्या उदरनिर्वाहासाठी रिक्षा चालविण्याचा उदयोग करीत होता. त्यावेळी त्याची ओळख ही गावाकडीलच अर्जून बाबर याचा भाऊ शिवाजी प्रल्हाद बाबर याच्याशी झाली होती. तो ही ठाणे येथेच काम करीत होता. त्याचवेळी त्याची आणखी एका बरोबर ओळख झाली होती. तो म्हणजे मदन कदम हा होय. तो ही इस्लामपूर भागातीलच होता. परंतु तो पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार होता. अक्षय, मदन आणि शिवाजी हे तिघे मित्र बनले होते. त्यातून त्याची ओली पार्टी होत होती. या पार्टीत दारूची रेलचेल असल्याने ते तिघे ही मनसोक्तपणे दारु पित ही होते. आणि एकमेकांना ...पान २ वर

## व्यभिचारी सविताचे सगळेच चुकले याराने ठार मारून विहिरीत फेकले

पन्हाळा/क्राईम रिपोर्टर



मयत सविता

शरीरसुखाला चटावलेली बाई तोंडाला रक्त लागलेल्या वाघिणी सारखी असते. तिला जो मनसोक्त सुख देईल त्याच्या सोबत मजमौज करताना ती कुणाचीही परवा करीत नाही. अगदी नवऱ्याला किंवा सासरच्या मंडळीना ही जुमानत नाही. आवली गावात राहणाऱ्या सविता पाटील ही सुद्धा अशीच एक व्यभिचारी महिला होती आणि तिचे गावातल्याच एका तरुणाशी तब्बल ९ वर्ष अनैतिक संबंध होते. पण सविताला आता तिच्या याराचाही कंटाळा आला होता. त्यामुळे तिने दुसरे सावज हेरले. मात्र याचा संशय तिच्या प्रियकराला येताच त्याने तिची गळा दाबून हत्या केली आणि मृतदेह विहिरीत टाकला आणि तिने आत्महत्या केल्याचा देखावा निर्माण केला. मात्र पोलिसांनी त्याचा सर्व बनाव हाणून पाडला आणि त्याला अटक केली.



शाहूवाडी तालुक्यातील आवळी येथील संजय पाटील याचा विवाह सविताशी गेल्या अकरा बारा वर्षापूर्वी झाला होता. यथावकाश या दाम्पत्यांना एक मुलगा आणि एक मुलगी ही झाली.त्या दोघांचा संसार बहरत असतानाच सविताचा संसारातून पाय घसरला होता.ती दिसायला जेवढी सुंदर आणि देखणी होती. तितकीच ती चालू ही होती. लग्नानंतर एक दोन वर्षातच तिचे गावातीलच नागेश पाटील याच्याबरोबर सुत जुळले होते. ते दोघे ही चोरी छुपे भेटत होते. नागेश ही तिच्या सौंदर्यावर खुश होता.नवऱ्याच्या पाठीत खंजिर खुपसून सविता ही नागेशला आपले सर्वस्व अर्पण करीत होती. सुरूवातीला त्या दोघांचे संबंध हे झाकून होते.परंतु आवळी सारख्या छोठया गावात अशा गोष्टी कितीही झाकल्या ...पान २ वर

## कुणीतरी संधी साधून अचूकपणे ठोकले दारुड्या दत्ताला शेतात मारून टाकले

पुणे/क्राईम रिपोर्टर

दारुड्या माणसाचा सगळ्यांनाच त्रास असतो. त्यामुळे अशा माणसाला केवळ बाहेरच्या लोकांकडूनच धोका असतो असे नाही तर त्याच्या त्रासाला कंटाळलेले कुटुंबातील लोकही रागाच्या भारत काहीही करू शकतात. मात्र जेंव्हा कुटुंबीयांवर संशय घ्यायला जागा उरत नाही. तेंव्हा मात्र तपासाची नेमकी दिशा सापडणे कठीण असते. पुण्यातील हडपसर नजीकच्या माळवाडी मधील शेतात दत्तात्रय कांबळे नावाच्या दारुड्याचा मृतदेह सापडला आहे, त्याची कुणीतरी दगडाने ठेचून हत्या केली. तो घरातून बेपत्ता होता आणि त्याच्या पत्नीने पोलीस ठाण्यात मिसिंगची फिर्याद सुद्धा नोंदवलेली होती. त्यामुळे दत्तात्रयची हत्या कोणी केली हे शोधून काढण्यासाठी आता पोलीस त्याच्या कुटुंबियांची तसेच गावातील गावकरी आणि दत्तात्रयच्या मित्रांची चौकशी करीत आहेत.

हडपसर येथील माळवाडी परिसरातील शेतात एका व्यक्तीचा डोक्यात दगड घालून खून केल्याची घटना गुरुवारी सकाळी उघडकीस आली. एका शेतकऱ्याला त्याच्या शेतात मृतदेह आढळल्यानंतर त्याने याबाबतची माहिती पोलिसांना दिली. यानंतर हडपसर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. खून झालेल्या ...पान ६ वर

## ओळख पाळख नसताना प्रेमाच्या आहारी गेली फोन फ्रेंड बनलेल्या भामट्याने फसवणूक केली



आरोपी जाधव

लातूर/क्राईम रिपोर्टर





प्रेमाचे नाते हे विश्वासावर अवलंबून असते. मात्र एखाद्याला न पाहताच त्याच्यावर विश्वास टाकणे आणि त्याच्याशी पैशाचा व्यवहार करणे म्हणजे फसवणुकीला आमंत्रण देण्यासारखे आहे. दुर्दैवाने आजकाल सोशल मीडियातील ओळखीनं काही लोकं खास करून महिला वर्ग सहज फसतो. त्याचबरोबर एखाद्या अनोळखी व्यक्तीने फोनवर चार शब्द बोलले तरी त्या व्यक्तीच्या बोलण्याला महिला फसतात आणि त्यांच्या जाळ्यात फसतात. लातूर मधील एका विवाहितेची अशीच अनोळखी फोन कॉल्सने फसगत झाली. तिला एकाने निनावी फोन करून मी तुझा जुना मित्र बोलतोय अशी बतावणी केली. त्यानंतर दोघांची सुरु झाली आणि याच चॅटिंगद्वारे रत्याने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून एक लाख १४ हजार ५०० रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी पोलिसांनी २४ तासात आरोपला अटक केली आहे.

लातूर येथील एका विवाहित महिलेला मोबाईल वरून फोन करून मी तुझा जुना मित्र आहे अशी ओळख सांगून नंतर तिच्याशी प्रेमाचे नाटक करत तिच्याकडून १ लाख १४ हजार ५०० रुपये एका भामट्याने उकळल्याची घटना घडलीय. याप्रकरणी पीडीत महीलेने दिलेल्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसाने तपासाचे चक्र गतिमान करत सदरील भामट्याला व त्याच्या अन्य एका साथीदाराला २४ तासात औरंगाबाद येथून अटक करत उत्कृष्ठ कागिरी केली आहे. ...पान ६ वर

## कुंपणावरून झालेला वाद प्राणावर बेतला शेजाऱ्यानेच वृद्ध शेजाऱ्याचा जीव घेतला

भंडारा/क्राईम रिपोर्टर

रागाला डोळे नसतात. त्यामुळे रागाच्या भरात माणूस काय करेल याचा नेम नाही आणि ग्रामीण भागात प्रामुख्याने जमीन जागा यावरूनच वाद होत असतात. कधी कधी हे वाद मिटवले जातात, तर कधी कधी अशा शुल्लक वादातून दुष्मनी वाढत जाते आणि त्यात एखाद्या माणसाचा जीव हि जातो. भंडारा जिल्ह्यातील एका छोट्याशा गावात दोन शेजाऱ्यांमध्ये कुंपणावरून वाद होता. मात्र हा वाद मिटतच नव्हता. त्यामुळे या वादातून दोन्ही शेजारी एकमेकांचे शत्रू बनले होते आणि एके रात्री सुधीर वर्कडे याने आपला शत्रू असलेल्या जोशीराव भालाबी याच्यावर पळत ठेऊन रात्रीच्या अंधारात त्याच्यावर कुऱ्हाडीचे घाव घालून त्याची हत्त्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला तात्काळ अटक केली आहे. विशेष म्हणजे ज्याची हत्या झाली तो ६५ वर्षांचा वृद्ध इसम आहे.

तुमसर तालुक्यातील राजापूर येथे कुंपणाच्या जागेच्या वादातून कुऱ्हाडीने मानेवर वार करून वृद्धाचा खून करण्याची घटना शुक्रवारी रात्री घडली. पोलिसांनी आरोपीस अटक केली आहे. जोशीराम दावजी भलावी (६५) रा. राजापूर असे मृताचे नाव आहे. तर सुधीर महागु वरकडे (५०) रा. राजापूर असे आरोपीचे नाव आहे. ...पान ६ वर

## शरीर सुखाची लालच दाखवून फसवणूक केली फेसबुकवरची मैत्रीण अखेर ब्लॅकमेलर निघाली

मुंबई/राजेंद्र वेदांते



फेसबुक आणि व्हॉट्सअॅप सारख्या सोशल मिडीयाचा खरे तर चांगल्या सामाजिक कार्यासाठी उपयोग व्हायला हवा. पण आजकाल फेसबुकवर फसवणूक करणाऱ्यांच्या टोळ्या सक्रीय आहेत. सुंदर बायकांच्या प्रोफाईल तयार करून चांगल्या आणि पैसेवाल्या लोकांना आकर्षित करायचे आणि त्यांना शरीर सुखाची लालच देऊन त्यांच्याकडून पैसे उकळायचे असे धंदे सुरु झाले आहेत. विशेष म्हणजे फेसबुकच्या मित्रांकडून फसवणूक झाल्याच्या घटना घडत असल्याच्या बातम्या नेहमीच लोकांच्या कानावर पडत असूनही लोकं त्यातून धसका घेत नाहीत किंवा सावध होत नाहीत. त्यामुळेच त्यांची शिकार होते. घाटकोपर येथे राहणाऱ्या मितुल लिंबाणी यांना अशाच एका फेसबुक मैत्रिणीने आपल्या जाळ्यात ओढून भिवंडीतील घरी भेटायला बोलावले व आपल्या साथीदारांच्या मदतीने त्याच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन त्याच्याकडून ६ लाख रुपये उकळले. या प्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय.

अनोळखी महिले बरोबर केलेली मैत्री माणसाला किती महाग पडू शकते हे खालील उदाहरणाने स्पष्ट होते. एफबीवरून अनेकांनी ओळख निर्माण करून गंडवा-गंडवी केली आहे. आपल्या समोरची व्यक्ती सुंदर तरुणी असेल तर त्या ओळख करून घेणारा तरून ...पान ६ वर

## शिक्षिका बस चालकासोबत पळून गेली गर्भवती झाल्यावर वर्षभराने प्रकट झाली

जळगाव/क्राईम रिपोर्टर

शिक्षिका म्हटले कि नजरेसमोर एक सोजवळ आणि संस्कारी महिलेची प्रतिमा उभी राहते. शारदा देवीच्या पवित्र मंदिरात विद्यादानाचे कार्य करणारी शिक्षिका एक आदर्श नारी म्हणून ओळखली जाते. पण आजकाल सर्वच क्षेत्रांना व्यभिचाराची बाधा झाली असून त्यातून शैक्षणिक क्षेत्रही सुटले नाही. त्यामुळे काही शिक्षकांनी विद्यार्थीनींवर वाईट नजर ठेवल्याच्या घटना घडल्या आहेत. तर काही शिक्षिकांचा सुद्धा पायघसरल्याच्या घटना समोर आल्या आहेत. मात्र हे सगळ शिक्षकी पेशाला काळिमा फसणार आहे. कारण चारित्र्य हाच शिक्षकी पेशाचा पाया आहे. पण आजकाल त्याचाच काहींना विसर पडला आहे.

पाचोरा येथील अशाच एका घटनेत एक शिक्षिका चक्क स्कूल बस चालकासोबत पळून गेली. त्यामुळे एकाच खळबळ माजली होती. मात्र वर्षभराने त्या शिक्षिकेचा आणि तिला पळवून नेणाऱ्या बस चालकाचा पत्ता लागला. जेंव्हा ती ९ महिन्यांची गर्भवती होती. मात्र दोघंही सज्ञान असल्याने पोलीस काहीच करू शकले नाहीत. प्रेम वेडं असतं, असे म्हणतात, त्यात जात, पात, वय व ...पान ६ वर

## पोलीस उप निरीक्षक असल्याचे त्याने भासवले तोतया अधिकाऱ्याने महिला पोलिसांना फसवले

नवी मुंबई/क्राईम रिपोर्टर



तोतया पोलीस

काही गुन्हेगार इतके निर्ढावलेले असतात कि कोणताही गुन्हा करायची त्यांना अजिबात भीती वाटत नाही आणि एकदाका केलेले गुन्हे त्याला पचत गेले कि मग त्याचा आत्मविश्वास बळावतो आणि एकदाका अशा गुन्हेगाराचा आत्मविश्वास बळावला कि मग पोलिसांना फसवायलाही तो मागे पुढे पाहत नाही. मिलिंद देशमुख या भामट्याने चक्क तोतया पोलीस उपनिरीक्षक बनून महिला पोलिसांनाच गंडा घातला. फेसबुकवर बनावट अकाऊंट तयार करून तो पोलीस दलातील महिलांशी मैत्री करायचा आणि नंतर त्यांच्याकडून पैसे उकळून त्यांना फसवायचा. मात्र त्याचे हे फसवणुकीचे धंदे फार काळ चालले नाही. शेवटी तो पकडला गेला.

मी पोलीस उपनिरीक्षक आहे. अशी भूलथापा देऊन महिला पोलीसांशी ओळख वाढवून त्यांची आर्थिक लूटमारी करण्याचा त्याचा व्यवसायाच होता. महिला पोलीस ही त्याच्या जाळ्यात अलगत फसत होत्या. एक पोलीस अधिकारी अडचणीच्या वेळी आपली मदत मागतोय म्हणून महिला पोलीस त्याला आर्थिक मदत करीत होत्या. परंतु हा पोलीस अधिकारी नसून एक ठग आहे हे जेंव्हा या महिला पोलीसांना समजले तेंव्हा त्यांना धक्काच बसला. त्यानंतर अनेक महिला पोलीसांनी या ठगाने आपली कशी फसवणूक केली याचा पाढाच तपास अधिकारी यांच्या पूढे मांडला. या गुन्ह्यातील अटक आरोपी हा फक्त महिला पोलिसांनाच टार्गेट करीत होता. असे पोलीसांनी चौकशीत ...पान ६ वर

C M Y K

09 TO 15 NOV 2020 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 07/11/2020 8:38 PM Page 1



## पान १ वरून....

### माजी महापौरांच्या कुटुंबावर घातला...

परिचीत आहे. माजी मंत्री सुरेशदादा जैन यांचा आशिर्वाद आणि पदस्पर्शाने अशोक सपकाळे यांनी जळगावचे महापौर होण्याचा मान मिळवला होता. गेंदालाल मिल परिसर हा माजी महापौर अशोक सपकाळे यांचा बालेकिल्ला समजला जातो. या प्रभागातून ते जळगाव शहर महानगर पालिका निवडणूकीत निवडून येत असतात. अशोक सपकाळे यांचा मुलगा राजु याचा ५ नोव्हेंबर रोजी वाढदिवस होता. राजु याच्या वाढदिवसानिमित्त त्याचे पिताश्री अशोक सपकाळे यांनी त्याच्यासाठी नवीकोरी केटीएम कंपनीची दुचाकी घेवून दिली होती. राजूचे दोघे भाऊ सोनू व राकेश हे देखील त्याचा वाढदिवस धुमधडाक्यात साजरा करण्यासाठी जोमाने कामाला लागले होते. रात्री ठिक बारा वाजेच्या ठोक्याला राजुचा वाढदिवस जल्लोषात साजरा करण्याचे नियोजन सोनू व राकेश यांनी सुरु केले होते. तिस हजार रुपयांचे फटाके, परिसरात मोठमोठे बॅनर लावण्याचे काम सुरु होते. रात्री बारा वाजता कापण्यासाठी मोठ्या आकारातील केकची ऑर्डर देण्यात आली होती. हा भलामोठा शाही स्वरुपाचा वाढदिवस साजरा करण्यास खुद्द राजुचा नकार होता. मात्र दोघे भाऊ त्याचा वाढदिवस साजरा करण्यासाठी जिद्द बाळगून होते. माजी महापौराच्या मुलाचा वाढदिवस म्हणजे काय? तो काय साधासुधा राहणार काय? असे म्हणत सोनू व राकेश या दोघा भावांनी जिव ओतून वाढदिवसाची तयारी सुरु केली होती. माजी महापौर अशोक सपकाळे यांचे रेल्वे स्टेशन परिसरात हॉटेल अशोका पॅलेस नावाचे लॉजींग आहे. या ठिकाणी वाढदिवसाच्या आदल्या रात्री अकरा वाजता म्हणजे ४ नोव्हेंबर रोजी अशोक सपकाळे व त्यांचे दोन्ही मुले राकेश व सोनु हजर होते. वडील अशोक सपकाळे यांना जेवणाचा डबा आणून देण्यासाठी सोनु यास दुचाकीने घरी जायचे होते. त्याच्या ताब्यात शोरुम मधून आणलेली नवी कोरी दुचाकी होती. नवी कोरी दुचाकी हाती असतांना भरधाव वेगात हाकण्याची मानसिकता त्याच्या तरुण रक्तात होती. रस्त्याने कुणाला लवकर साईड द्यायची नाही, आपणचे पुढे रहायचे ही मानसिकता इतर काही तरुण मुलांप्रमाणे त्याच्या देखील मनात रहात होती. अशोक सपकाळे यांच्या चारचाकीवरील चालक सलमान शेख यास सोनुने त्याच्या ताब्यातील दुचाकीवर डबलसीट बसवले. दोघे जण घरुन जेवणाचा डबा आणण्यासाठी दुचाकीवर निघाले. शिवाजीनगरच्या दिशेने घरी जातांना वाटेत स्मशानभुमीनजीक सोनू यास त्याच्या ओळखीचा विशाल संजय साळुंखे त्याला दुचाकीने जातांना दिसला. विशाल व त्याचा साथीदार असे दोघे जण दुचाकीने शिवाजीनगरच्या दिशेने जात होते. एकदम तरुण असलेल्या सोनूच्या ताब्यात नवीकोरी दुचाकी होती. त्यामुळे साहजिकच त्याच्या तरुण वयाच्या मानसिकतेप्रमाणे तो भरधाव वेगात ओव्हरटेक करुन दुचाकी हाकत होता. त्याने विशाल व त्याच्या साथीदारास मागे टाकून पुढे जाण्यास साईड दिली नाही. आपणच पुढे रहावे ही सोनूची मानसिकता होती. सोनू आपल्या मागून येवून भरधाव वेगात पुढे जातो आणि साईड देखील देत नाही याचा विशाल व त्याच्या दुचाकीवर डबलसीट बसलेल्या साथीदारास राग आला. रागाच्या भरात विशालने त्याच्या ताब्यातील एफझेड ही मोटारसायकल अजून भरधाव वेगाने त्याला ओव्हरटेक करत पुढे नेली. संतापात असलेल्या विशालने त्याच्या ताब्यातील दुचाकी सोनूच्या दुचाकीला आडवी लावली. त्यामुळे साहजीकच सोनू यास करकचून ब्रेक लावून दुचाकी जागेवर उभी करावी लागली. त्याचवेळी पाठोपाठ होंडा शाईन मोटारसायकवर गणेश दंगल सोनवणे व त्याचेसोबतचे दोन तरुण असे ट्रिपल सिट आले. त्यांनी सोनूच्या ताब्यातील नव्या कोऱ्या दुचाकीला जोरात लाथ मारली. त्यामुळे त्या दुचाकीसह सोनू व सोबत असलेला सलमान शेख खाली पडले. त्यात दुचाकीचे नुकसान झाले. आता जागेवर सोनू सोबत सलमान असे दोघेच जण असतांना विरुद्ध बाजुला प्रतीस्पर्ध्याच्या रुपात पाच जण होते. यातील गणेशने त्याच्या हातातील तलवारीने सोनूच्या नव्याकोऱ्या मोटारसायकलचे नुकसान केले. तलवारीने दुचाकीचे नुकसान केल्यानंतर सोनूच्या मनात दहशत निर्माण झाली. तीच तलवार गणेशने सोनूवर उगारत डोक्यावर मारण्याचा प्रयत्न केला. सोनुने तलवारीचा तो हल्ला चुकवला. त्यामुळे तलवारीचा वार सोनूच्या उजव्या हाताच्या कोपऱ्याला लागला. काही कळण्याच्या आत सर्व पाच जण एकत्र आले. त्यांनी सोनू यास लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. दरम्यान राजूच्या वाढदिवसाची तयारी करण्याच्या उद्देशाने सोनूचा लहान भाऊ राकेश व त्याचा मित्र सचिन असे दोघे जण चारचाकी वाहनाने मागून येत होते. आपला भाऊ सोनू पाच जणांच्या तावडीत सापडल्याचे बघून राकेशने लागलीच जागेवर कार उभी केली. त्याने रस्त्यावरील पाचही जणांच्या तावडीतून सोनू यास सोडवण्याचा पुरेपुर प्रयत्न सुरु केला. सुरु असलेला वाद आणि सोनुला होत असलेली मारहाण सोडवण्याचा प्रयत्न करत असतांना गणेशने त्याच्या हातातील तलवारीने राकेशवर वार केला. तो वार राकेशच्या उजव्या व डाव्या पायाच्या मांडीवर बसला. काही कळण्याच्या आत विशालने त्याच्या कब्जातील चॉपर बाहेर काढला. त्या चॉपरचे वार विशालने राकेशच्या डोक्यावर केला. चॉपरचा वार डोक्यावर बसताच तो विव्हळत खाली कोसळला. या घटनेत तलवार, चॉपर, लाकडी दांडे व आसारी यांचा वापर करण्यात आला. दरम्यान त्याठिकाणी लोकांची गर्दी जमली. लोकांची जमलेली गर्दी आणि राकेशचे जिवघेणे विव्हळणे बघून सर्व जण त्यांच्या ताब्यातील मोटारसायकलने पसार झाले. या घटनेची माहिती सोनूने वाढदिवस असलेला मोठा भाऊ राजू यास मोबाईलद्वारे कळवण्याचा प्रयत्न केला. मात्र राजूचा फोन लागला नाही. त्यामुळे सोनूने त्याला फोन करण्याचा प्रयत्न सोडून दिला. त्याने सलमान यास जखमी राकेश जवळ उभे करुन दुचाकीने थेट घर गाठले. त्याने राजु यास सर्व हकीकत ओक्साबोक्सी रडत कशीबशी कथन केली. त्याने राजूला मोटारसायकलवर बसवून लागलीच घटनास्थळावर राकेशजवळ आणले. दोघा भावांनी जखमी राकेशला मोटारसायकलवर मध्यभागी ट्रिपलसिट बसवून शहरातील ओम क्रिटीकल हॉस्पीटल येथे आणले. डॉक्टरांनी तपासणी करुन त्यास मयत घोषीत केले. दरम्यान घरुन जेवणाचा डबा येणार असल्याची वाट बघणाऱ्या अशोक सपकाळे यांना या घटनेची माहिती समजताच त्यांनी देखील दवाखाना गाठला. आपल्या मुलाचा जखमी अवस्थेतील मृतदेह बघून त्यांची देखील पाचावर धारण बसली. राजुच्या वाढदिवसासाठी झटणाऱ्या राकेशचा मृतदेह बघून एक पिता असलेल्या अशोक सपकाळे यांचे दुख: उपस्थीतांना बघवले जात नव्हते. तशाही अवस्थेत त्यांनी जळगाव शहर पोलिस स्टेशनला फोन करुन या घटनेची माहिती दिली. सोनूच जिव वाचवणाऱ्या आणि राजुच्या वाढदिवसाची तयारी करणाऱ्या राकेशचा जिव गेला होता. हे दुख: अशोक सपकाळे यांना पेलवले जात नव्हते. माझा वाढदिवस करु नका असे राजू सर्वाना वेळोवेळी सांगत होता. मात्र उत्साहाच्या भरात दोघे भाऊ त्याचा वाढदिवस जंगी स्वरुपात करण्याच्या तयारीला लागले होते. तो वाढदिवस जागेवरच राहीला होता. ज्या दिवशी एका भावाचा वाढदिवस त्याच दिवशी दुसऱ्या भावाचा मृत्यूचा दिवस झाला होता. हा एक दुर्दैवी योग होता. या घटनेची माहिती मिळताच पोलिस अधिक्षक डॉ.प्रविण मुंढे यांनी तात्काळ सहायक पोलिस अधिक्षक कुमार चिंता व शहर पोलिस स्टेशनसह स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाला तपासकामी योग्य त्या सुचना दिल्या. या घटनेप्रकरणी सोनू अशोक सपकाळे याने दिलेल्या फिर्यादीनुसार जळगाव शहर पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न. २११/२० भा.द.वि. १४३, १४७, १४८, १४९, ३०२, ३०७, ३४१, ३३२, ४२७, ३४ तसेच आर्म ॲक्ट ४/२५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेत पोलीस अधिक्षक डॉ.प्रविण मुंडे,अप्पर पोलीस अधिक्षक चंद्रकांत गवळी,सहायक पोलीस अधिक्षक कुमार चिंता यांनी जळगांव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय येरुळे, शनीपेठ पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक विठ्ठल ससे, स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार बकाले यांना गुन्हयातील आरोपींचा शोध घेण्याकामी योग्य ते मार्गदर्शन व सुचना दिल्या. जळगाव शहर पोलिस स्टेशनचा नुकताच चार्ज घेतलेले पो.नि. धनंजय येरुळे यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलिस नाईक गणेश पाटील, प्रफुल्ल धांडे, भास्कर ठाकरे, किशोर निकुंभ, पो.कॉ.रतन गिते, पो.कॉ.तेजस मराठे, योगेश इंधाटे यांना हल्लेखोर आरोपींच्या शोधार्थ रवाना केले. याशिवाय जळगाव शहर पोलिस स्टेशनमधून नुकतेच एमआयडीसी पोलिस स्टेशनला बदलून गेलेले मुकेश पाटील, किशोर पाटील व सुधीर साळवे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे नितीन बाविस्कर, जितेंद्र पाटील, प्रमोद पाटील, राजू मेंढे, संजय हिवरकर यांचे पथक देखील फरार आरोपींच्या शोधार्थ रवाना झाले. या गुन्हयातील संशयीत आरोपी गणेश दंगल सोनवणे, विशाल संजय साळुंखे,हे दोघे संशयीत आरोपी आसोदा रेल्वे गेट परिसरातून पळून जात असल्याची गुप्त माहिती पोलिस कर्मचारी तेजस मराठे व योगेश इंधाटे यांना समजली. त्यांनी तात्काळ आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने आसोदा रेल्वे गेटजवळ सापळा रचून गणेश दंगल सोनवणे व विशाल संजय सांळुखे या दोघांना अवघ्या दोन तासाच्या आत शिताफीने जेरबंद केले. काही तासांनी रुपेश संजय सपकाळे व महेश राजु निंबाळकर यांना देखील जळगाव शहरातून पळून जाण्याच्या बेतात असतांना ताब्यात घेत अटक करण्यात यश मिळवले. खोलात जावून पाहिले असता हा वर्चस्वाचा वाद असल्याचे लक्षात येते. जळगाव शहरात अधून मधून गँगवॉर डोके वर काढत असते. या घटनेतील मयत राकेश व हल्लेखोर गणेश, विशाल यांच्यात देखील वर्चस्वाचा वाद असल्याचे बोलले जात आहे. सर्व संशयीतांना न्यायालयात हजर केले असता त्यांना सुरुवातीला सहा दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली. या गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस अधिक्षक कुमार चिंता, पोलिस निरीक्षक धनंजय येरुळे तसेच त्यांचे सहकारी करत आहेत.

### अर्जुन बाबर भयंकर सुडाने पेटला...

पाजवत ही होते. त्यातच काही किरकोळ कारणातून सन २०१५ मध्ये शिवाजी बाबर याचा खून ठाणे येथे झाला होता. हा खून अक्षय यानेच केल्याचे मदन कदम याने पोलीसाना सांगितले होते. आता त्यामध्ये मुख्य आरोपी म्हणून अक्षय भोसले हा होता. त्यानेच त्याचा खून किरकोळ कारणातून केला असल्याचा संशय पोलीसांना होता. पोलीसांनी त्याच्या विरोधात कोर्टात केस ही दाखल केली होती. त्या केसचा निकाल सन २०१८मध्ये लागून सबळ पुराव्या अभावी त्या खून प्रकरणातून अक्षय याची निर्दोष मुक्तता कोर्टाने केली होती. त्यानंतर अक्षय हा त्या खून प्रकरणातून सुटल्याने तो ठाणे येथील आपला मुक्काम सोडून तो गावी उरणवाडी येथे राहयला आला होता. गावाकडे आल्यावर अक्षय हा सरळ आणि सभ्य जीवन जगू लागला होता. शिवाजी बाबर याचा भाऊ अर्जुन बाबर हा मदन कदम याच्या संपर्कात असायचा. मदन कदम याने अर्जुन याला तुझ्या भावाचा खून अक्षय भोसले याने केल्याचे सांगितले होते. त्यामुळे अर्जून हा आता अक्षयवर चिडून होता. त्याला आपल्या भावाच्या खूनाचा बदला घ्यायचा होता.त्यामुळे तो अक्षयवर टपून होता. माझ्या भावाचा खूनाचा बदला घ्यायचा आहे हे त्याने आपला मित्र मदन कदम,सुरज गायकवाड आणि आणखी एक मित्र यांना सांगितले होते. आपला भाऊ गेला आहे.त्याचा खून अक्षयनेच केला आहे. कोर्टाने जरी त्याला निर्दोष सोडले असले तरी मी त्याला सोडणार नाही असे अर्जूनचे म्हणणे होते. अर्जून, मदन आणि सुरज हे तिघे जण त्याची गेम करण्याची योजना आखत होते. त्यातच अक्षय हा ठाणे येथून आल्यानंतर गावात आणि इस्लामपूर येथे भाजीविक्रीचा व्यवसाय करीत होता.कोरोनाच्या लॉकडाऊनच्या काळात मार्चमध्ये त्याचा मामा पवेकर यांच्या भावाच्या मुलीबरोबर त्याचे थाटामाटात लग्न झाले होते.आता तो सरळ मार्गी जीवन जगत होता.त्याला भाजीपाल्याच्या व्यवसायातून चार पैसे मिळत होते. त्यातच तो आपल्या नवविवाहित पत्नीबरोबर सुखाने संसार करू लागला होता.काही पैसे तो आपल्या आई वडिलांना ही देत होता. अक्षय हा आता सरळ मार्गी वागत असल्याने त्याच्या मामानी म्हणजे पवेकरांनी त्याला इस्लामपूर येथील मच्छी मार्केमध्ये मासे विक्रीचा व्यवसाय या दसऱ्याच्या मुहूर्तावर काढून दिले होते. तो आता भाजीपाल्याबरोबर मासे ब्रिकीचा ही व्यवसाय करू लागला होता. सकाळी लवकर उठून उरणवाडी येथून येवून तो इस्लामपूर येथील मासे मार्केटमध्ये तो मासे ब्रिकीचा व्यवसाय करू लागला होता. रात्री उशिरा तो आपल्या गावी परत जात होता.तो आता व्यवसायात चांगला गुरफटल्याने आपल्या हाताला लागत नाही हे बघून अर्जून पिसाळला होता. त्याला त्याची काही ही करून गेम करायची होती.ते त्याच्या मागावरच होते. अर्जून तर काही ना काही निमित्य काढून त्याच्या मासे विक्रीच्या ठिकाणी जावून आपण मागचे सगळे विरून गेलो आहोत हे त्याला दाखवत होता. त्याच्या डोक्यात काय चालले आहे हे अक्षय ओळखू शकला नाही. अर्जूनचे त्याच्याकडे येणे जाणे वाढले होते.तो आपल्याशी जुणे वैर विसरून वागत आहे आणि आपल्याशी मैत्री करत आहे असे अक्षयला वाटत होते.त्यातच बुधवार दि.२८ रोजी अर्जून याने त्याच्या मासे विक्रीच्या ठिकाणी जावून आज मी, मदन आणि सुरज दारूची पार्टी करणार आहोत तु पार्टीला येणार का असे मुद्दामच त्याला विचारले त्यावेळी त्याच्या सोबतमदन आणि सुरज ही होते. त्यावेळी त्या तिघांनी त्याच्याकडून उधारीवर कोळंबी आणि मासे खरेदी केले होते. त्यावेळी ते तिघे ही त्याच्याकडून मासे उधारीवर घेवून गेले होते. त्यांनतर ही दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरूवारी दि.२९ ऑक्टोंबर रोजी संध्याकाळच्या सुमारास ते तिघे ही परत त्याच्याकडे उधारीवर मासे मागण्यासाठी आले होते. त्यावेळी अक्षय याने त्या तिघांना माझी कालची उधारी दया.आणि आज मासे न्या. माझे दुकान नविन असल्यामुळे मी उधारीवर धंदा करत नाही असे बजावले होते. या गोष्टीचा राग त्यांना ही आला होता. पण त्यांनी त्याला तसे दाखविले नाही.त्याना कांहीही करून त्याच्याबरोबर भांडण काढायचे असल्याने त्या तिघांनी ही त्याच्याबरोबर वाद घातला होता. त्या वादात त्यांनी त्याला बघून घेण्याची भाषा केली होती.आणि ते तेथून निघून गेले होते.गेल्या चार पाच दिवसापसून ते तिघे ही अक्षयच्या पाळतीवर होते.तो कधी येतो आणि कधी गावाकडे जातो याची त्यांनी गुपचुपपणे माहिती काढली होती.आज त्यांना अक्षयची गेम करायची होती.म्हणून ते त्याच्या मागावर आज राहिले होते. गुरूवारी मासे विक्रीचा धंदा बंद करून अक्षय हा इस्लामपूर येथून आपली दुचाकी गाडी क्र एम एच १०डीएच ९५२७ वरून उरणवाडी कडे निघाला होता.जाताना तो आपला मामा पवेकर याच्याशी मोबाईलवर बोलत होता.मामाशी फोनवरून बोलत असताना तो त्याना दुसऱ्या दिवशी लागणाऱ्या मासांची ऑर्डर ही देत होता.त्याचे मामा त्याच्याशी फोनवर बोलत होते.तो ओढा ओलांडून तुजारपूर रोडने रात्रीच्या अंधारात उरणवाडीकडे चालला होता.त्यावेळी रात्रीचे ८.४५ झाले असतील ओढयाच्या पलिकडे असणाऱ्या रस्त्यावरील मायाक्का मंदिरापाठीमागील रस्त्याला तो लागला होता.तो उरणवाडीकडे जाण्याचा शॉर्टकट रस्ता होता.त्याच्या पायाखालचा तो रस्ता असल्याने तो बिनधास्तपणे मामा पवेकर यांच्याबरोबर फोनवरून गाडीने चालला होता. इतक्यात अर्जून, मदन आणि सुरज हे त्याच्या गाडीच्या आडवे आले होते. त्याच्या हातात कोयता, चाकू होते. त्यांनी अक्षयला वाटेत अडवून त्याला गाडीवरून खाली पाडले. व त्याला काही कळायच्या आतच त्याचेवर चाकूने आणि कोयत्याने वार करायला सुरूवात केली होती. त्यांनी त्याच्या डोक्यावर, मानेवर, पोटात जवळपास २९ वार करून त्यांनी त्याचा कोथळाच बाहेर काढला होता.त्याच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने तो जागेवरच कोसळला होता.मारेकऱ्यांनी ज्यावेळी त्याला खाली पाडले त्यावेळी त्याचा फोन चालूच होता.त्याचेवर वार होत असताना पलिकडून फोनवर बोलणाऱ्या त्याच्या मामाना त्याचा ओरडण्याचा आवाज जात होता.ते त्याला फोनवर काय झाले काय झाले म्हणून विचारीत होते. परंतू मारेकऱ्यांनी त्याच्यावर वार करून त्याला मारून टाकले असल्याने तो घटनास्थळी निपचिप रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. काही तरी अक्रीत घडल्याची जाणीव पलिकडून बोलणाऱ्या त्याच्या मामाना झाली होती.म्हणून ते आपल्या इतर दोन तीन ओळखीच्या मित्राबरोबर आणि नातेवाईकांना सोबत घेवून मायाक्का मंदिराच्या बाजूने येत होते.कुणी तरी येत असल्याचे बघून त्या चौघांनी ही तेथून पळ काढला होता.मामा पवेकरांनी येवून घटनास्थळी बघितल्यावर अक्षयचा खून झाल्याचे त्याच्या लक्षात आले होते. त्यांनी या घटनेची त्वरीत माहिती इस्लामपूर पोलीस स्टेशनला दिली होती. या खूनाची माहिती मिळाल्यावर घटनास्थळी इस्लामपूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांनी दाखल होऊन तपास चालविला होता. घटनास्थळावर श्वान पथकाला पाचारण करून आरोपीचा माग काढत असताना ते श्वान इस्लामपूर रोडवरील आंबेडकर नगर येथील दारू दुकनाच्या दिशेने गेले होते. तसेच घटनास्थळावरील पडलेल्या आरोपीच्या चप्पलांचा वासाने श्वान मायाक्का मंदिरामागे असणाऱ्या एका खोलीपर्यत गेले होते. पोलीसांनी तरीही आरोपीचा सुगावा काही लागला नाही. पोलीस या घटनेचा तपास करत असताना दिवसभरच्या घडलेल्या घडामोडी आणि अक्षयच्या संपर्कात आलेल्या लोकांची माहिती घेत होते. त्यातच संध्याकाळी अर्जून बाबर,मदन कदम आणि सुरज गायकवाड यांच्याबरोबर अक्षयची बाचाबाची झाल्याची माहिती पोलीसांना मिळाली होती. या माहितीवरून पोलीसांनी या घटनेतील मदन कदम याला ताब्यात घेवून त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केल्यावर पोलीसासमोर त्याने आपला गुन्हा कबुल केला होता. अक्षय भोसले याचा खून मी, अर्जून बाबर, सुरज गायकवाड आणि आणखीन एक नाव माहित नसलेल्या चौघांनी केल्याचे स्पष्ट करून अर्जूनच्या भावाच्या खूनाचा बदला म्हणून अक्षयचा खून केल्याचे त्याने पोलीसांना सांगितले. त्याने खूनाची कबुली दिल्याने या घटनेतील मुख्य संशयीत फरारी आरोपी अर्जून बाबर,सुरज गायकवाड आणि एका अज्ञात तरूणाचा पोलीस शोध घेत होते. कथा शब्दबध्द होईपर्यत हे तिघे ही फरारी होते.त्याचा शोध चालू होता. मामा पवेकर यांच्या फिर्यादीवरून पोलीसांनी अक्षय तुकाराम भोसले (२८) याच्या खून प्रकरणी अर्जुन बाबर, मदन कदम सुरज गायकवाड आणि एका अज्ञात तरूणाविरूध्द भादंवी कलम ३०२ व इतर कलामाखाली गुन्हा नोंदवून पुढील तपास चालू ठेवला होता. मदन कदम याला पोलीसांनी इस्लामपूर येथील कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा तपास सांगली पोलीस अधिक्षक दिक्षीतकुमार गेडाम, अप्पर पोलीस अधिक्षक मनिषा दुबले,यांच्या मार्गदर्शनानुसार उप विभागीय पोलीस अधिकारी कृष्णांत पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.निरी.नारायण देशमुख हे करत आहेत या घटनेतील मुख्य आरोपीसह इतर दोघांचा ही लवकरच शोध लावला जाईल व त्यांना गजाआड केले जाईल असे पोलीस सुत्रांनी प्रसार माध्यमांना सांगितले आहे.

### व्यभिचारी सविताचे सगळेच चुकले...

तरी त्या गोष्टीची लगेचच वाच्यात होते. तसेच त्याच्या ही संबंधाचे झाले होते. सविताचे सासु सासरे आणि नवरा दिवसभर शेतात जात होते.तर ती नागेशला भेटायला जात होती.तिचा नवरा संजय पाटील हा साधा सरळ वागणारा माणुस होता. तो कोणाच्या ही अध्यातमध्यात न पडता आपण भले आणि आपले काम भले असे राहत होता.त्याच्या या स्वभावाचा गैरफायदा सविताने घेतला होता. ती आणि नागेश चोरून भेटत होते.त्या दोघांचे ते संबंध वाढीस लागलेले होते. तिच्यासाठी त्याची कायपण करायची तयारी होती.म्हणून तो तिच्यावर वारेमाप पैसे खर्च करीत होता.अर्थात या गोष्टीपासून संजय पाटील हा अनभिज्ञ होता.त्याला आपली पत्नी ही सोज्वळ वाटत होती. परंतु त्याच्या हे लक्षात आले नव्हते की देखणी बायको ही दुसऱ्याची असते. रात्री झोपायला जवळ आणि दिवसा प्रियकराच्या कुशीत अशी तिची अवस्था होती.त्यातच त्यांची मुले ही मोठी झाली होती.त्यांना ही आपल्या आईचे वागणे समजत होते. पण ते काहीच बोलू शकत नव्हते. तिने आपल्या हेकेखोर स्वाभावने नवऱ्याला सासू सासऱ्याना गप्प बसविले होते.काही समजून उमजून ही तिचा नवरा संजय हा तिच्या त्या संबंधाकडे काना डोळा करीत होता. याचाच फायदा घेत ती नागेशला आपल्या मिठीत घेत होती. तो ही तिची जवानी ओरबाडुन काढीत होता. ३२ वर्षीय सविताची जवानी ही रसगुल्यासारखी होती. तिच्या भरगच्च जवानीवर तो तुटून पडत असताना तो काहीच कसर सोडत नव्हता. तिच्या गोऱ्या पान मांडया बघूनच तो चेकाळत होता. तो तिच्यावर स्वार झाला की तिची दमछाक होत होती. त्याचे रगडणे ओरबाडणे तिला हवे हवेसे वाटत होती. म्हणूनच ती त्याला माझा राजा म्हणत आपल्या नागडया अंगावर ओढून घेत होती. तिने त्याला आपले शरीर दिल्याने ती ही त्याच्याकडून पाहिजे ते उकळत होती.तिचा हा चालूपणा त्याला चांगला माहित असल्याने तो ही तिला ओळखून होता. ती या विवाहबाहय संबंधातून नवऱ्याला धोका देवू शकते तर आपल्याला का धोका देणार नाही याचा तो विचार करीत होता. तिच्याबरोबर तो मजा मारत असताना तो तिला असे काही सुख देत होता की तिला तिचा नवरा हा नकोसा वाटत होता. तिचा नवरा बिछान्यावर तिच्याबरोबर पाच सात मिनिटात आपला कार्यक्रम आटोपत होता. तर नागेश तिच्याबरोबर रात्रभर खेळत तिची तंग जवानी ओरबाडत होता. म्हणूनच ती आपल्या नवऱ्याला किमंत देत नव्हती. आता तर तो तिच्या जवानीवरच फिदा झाला होता.आपल्या शिवाय तिने दुसऱ्या कोणत्याही पुरूषाबरोबर बोलू नये किंवा त्याच्याशी संबंध ठेवू नये असे त्याला वाटत होते. अलिकडे सविता ही त्याला भेटण्याचे टाळत होती. त्यामुळे त्याला तिच्याबाबत वेगळीच शंका येत होती. ती चालू असून आपल्याशिवाय ती दुसऱ्या कोणत्या तरी तरूणाला अंगावर घेवून खेळवते, असा संशय त्याला येत होता.त्याने तिला न भेटण्याचे कारण विचारले तर ती आता आपले संबंध येथेच थांबवू माझी मुले ही मोठी झालेली आहेत, त्यांना सर्व काही कळत आहे. त्यामुळे मी तुला भेटायला येवू शकत नाही असे सांगत होती.तरीही तो तो तिला महिन्यातून एकदा किंवा पंधरा दिवसातून एकदा बाहेर बोलावून तिच्याबरोबर मजा मारीत होता. तिच्या राणीला तो असे काही भुलला होता की अलकिडे तो तिच्यावर आपला हक्क गाजवू लागला होता.तिचा स्वभाव हा मुळात हेकेखोर असल्याने ती त्याचा दबाब झुगारून टाकत होती. या कारणातून त्या दोघात वारंवार भांडणे आणि वादविवाद होत होते. तरीही त्याच्या त्या संबंधात खंड पडला नव्हता. ते दोघेही कोल्हापूर आणि मलकापूर येथे भेटत होते. तर कधी ती सासू सासऱ्याच्या व नवऱ्याच्या माघारीच आपल्या घरात बोलावून घेवून त्याला आपल्या अंगावर घेत होती. एकदा ते दोघे तिचा नवरा संजय याला त्याच्याच घरात रंगेहात सापडले होती. दुपारच्या वेळेस घरात कुणी नसताना तिने त्याला घरात बोलावून घेतले होते. काही कामानिमित्य बाहेर गेलेला संजय परत आला त्यावेळी त्याला घरातील बेडरूममधून कण्हण्याचा आवाज ऐकू येत होता. त्याने कानोसा घेत पुढे जावून पाहिले असता, सविताच्या नागडया अंगावर नागेश तुटून पडला होता. तो तिला घुसळत ओरबाडत होता. त्याचे रगडणे चालू होते. समोरचे ते दृश्य बघून संजय खाली मान घालून घरातून बाहेर गेला होता. त्याला आपल्या पत्नीचे प्रताप समजले होते. याचा जाब नंतर त्याने सविताला विचारल्यावर तिने त्याला खडसावून, बघू वाटत असेल तर बघा. नाही तर डोळे झाकून बसा. असे सांगून त्याला गप्प बसविले होते. ती सांगून ही ऐकत नाही म्हणून तो ही गप्प बसला होता. इकडे मात्र ती नागेशला भेटून आपले शरीर रगडून घेत होती. त्याला ही त्या कामासाठी ती पाहिजे असल्याने तो तिला सोडू इच्छित नव्हता. तरीही तो तिच्यावर शंका घेवून तुझे माझ्या शिवाय दुसऱ्या अन्य दोघाबरोबर लफडे आहे त्याची माहिती मला मिळाली आहे म्हणून तिच्याबरोबर भांडत होता. त्या दोघांच्या संबंधाची आता जाहीर वाच्यताच झाली होती.त्यामुळे तिच्याकडे बघण्याचा लोकांचा दृष्टीकोन वेगळा बनला होता. ती आपल्या पूर्वीसारखे भेटत नाही.शरीर सुख देत नाही म्हणून तो तिच्याबरोबर भांडत होता. रविवार दि.१ नोव्हेंबर २०२० रोजी संध्याकाळी सातच्या सुमारास ती त्याला नेहमी प्रमाणे भेटायला गेली होती. त्यावेळी त्याने तिला गावाबाहेर नेवून तिच्याशी मनसोक्त पणे मजा मारली. त्यानंतर त्या दोघांचे या कारणातून भांडण सुरू झाले त्या भांडणातच त्याने तिचा रागाच्या भरात जोरात गळा दाबून धरला होता. त्यातच तिचा जागेवरच मृत्यू झाला होता. आपल्या हातून तिचा खून झाल्याचे लक्षात आल्यावर नागेश हा मनातून घाबरला होता. हिच्या खूनाचा आळ आपल्यावर येवू नये म्हणून त्याने तिला त्या निर्जन जागेवरून ओढत नेवून जवळच्याच विहिरीत टाकले होते. इकडे त्या दिवशी संध्याकाळी बाहेर गेलेली सविता रात्री पर्यत परत आली नाही म्हणून तिचा नवरा संजय आणि त्याच्या भावकीतील लोकांनी तिचा सर्वत्र शोध घ्यायला सुरूवात केली होती. पण ती कुठेच मिळून आली नसल्याने दुसऱ्या दिवशी संजय याने पत्नी बेपत्ता झाल्याची तक्रार कोडोली पोलीसात दिली होती. पोलीस आणि संजयसह त्याचे नातेवाईक तिचा शोध घेत होते. बुधवार दि.४ नोव्हेंबर रोजी गावातीलच एका विहिरीत एका महिलेचा मृतदेह पाण्यात तरंगत असल्याचे काही लोकांना दिसून आले होते. त्यांनी या घटनेची माहिती संजय पाटील याला दिली होती. त्यांनी घटनास्थळी जावून पाहिले असता. विहिरीच्या पाण्यात तरंगत असलेली महिला ही त्याची पत्नी सविता असल्याचे लक्षात आले. त्यांनी या घटनेची माहिती त्वरीत कोडोली पोलीसांना दिली.कोडोली पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी स्थानिक लोकांच्या मदत्तीने सविताचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढला. पंचनाम्याचे सर्व सोपस्कर पुर्ण करून मृतदेह उतरीय तपासणीसाठी कोडोली येथील शासकीय रुग्णालयात पाठवून दिला. पोलीस याघटनेची माहिती घेत असताना सविताच्या गळ्यावर गळा आवळ्याच्या खुणा दिसत होत्या. तिने आत्महत्या केली की. तिचा कुणी घातपात केला याबाबत पोलीस ही साशंक होते. पोलीसांना पोस्टमार्टमच्या रिपोर्टची प्रतिक्षा होती. पोलीस या घटनेची माहिती घेत असताना सविताचा पती संजय पाटील याच्यावरच पोलीसाची संशयाची सुई वळत होती. म्हणून पोलीस त्याला पोलीस स्टेशनममध्ये बोलावून उलट सुलट प्रश्न विचारीत होते. तो पोलीसांच्या प्रश्नांना समर्पक अशी उत्तरे देत होते. त्याने सांगितलेल्या माहितीवरून त्याची पत्नी सविता हिचे नागेश पाटील याच्याबरोबर विवाहबाहय संबंध होते.त्यानेच तिचा घातपात केल्याचा संशय त्याने पोलीसांना बोलून दाखविला होता. ही माहिती पोलीस घेत असताना पोलीसांना पोस्टमार्टमचा रिपोर्ट ही मिळाला होता.ज्यामध्ये तिचा गळा आवळून मृत्यू असा उल्लेख होता. याचा तिने आत्महत्या केली नसून तिचा खून झाला आहे असा होता. यामाहितीवरून पोलीसांनी घटनेनंतर अवघ्या बारा तासाच्या आतच संशयीत आरोपी नागेश पाटील याला ताब्यात घेतले होते.त्याच्याकडे सविताविषयी चौकशी केली असता,त्याने आपला गुन्हा कबुल करून मयत सविताबरोबर आपले विवाहबाहयस संबध गेल्या नऊ वर्षापासून असल्याचे सांगून. आलिकडे तिच्या वागण्या बोलण्यात फरक जाणवू लागल्याने त्याला तिचे इतर दुसऱ्या कोणत्या तरी तरूणाशी संबंध असल्याची शंका येत होती. त्यातून त्या दोघांची भांडणे होत होती.घटनेच्या दिवशी म्हणजे १ नोव्हेंबरला त्याने तिला संध्याकाळच्या ७ वाजणेच्या सुमारास गावातील निर्जन ठिकाणी बोलावून घेतले होते.तेथे त्याने तिच्याबरोबर शारीरिक संबध करून तिच्याबरोबर या कारणातून भांडण काढले असता त्या भांडणात त्याने तिचा रागाच्या भरात गळा आवळून खून केला होता. त्यानंतर त्याने तिचे प्रेत जवळच्याच पाण्याच्या विहिरीत टाकले होते. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी त्याला अटक करून ताब्यात घेतले होते. या घटनेची फिर्याद मयत सविताचा पती संजय पाटील याने कोडोली पोलीसात दिल्याने पोलीसांनी सविता संजय पाटील (वय ३२) हिच्या खूनप्रकरणी तिचा प्रियकर नागेश बाबसाहेब पाटील (वय २३.रा.आवळी ) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले होते. मा.कोर्टाने त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान त्याने आपल्या गुन्हयाची कबुली पोलीसांना दिली होती. सदर गुन्हयाचा तपास शाहूवाडी उपविभागीय पोलीस उपाधिक्षक अनिल कदम,यांचे मार्गदर्शनाखाली स.पा.नी. सुरज बनसोडे, प्रदिप यादव, भैरू माने, हिंदुराव केसरे, रवी कांबळे, विश्वास चिले आदीनी केला. विवाहबाहय संबंधात बाई भरकटत गेली की त्यातून अघटित अशीच घटना घडते. वासनेला ना वयाचे बंधन असते. ना नात्याचे, त्यातूनच विवाहबाहय संबध वाढीस लागत असतात. त्या संबधात सविता ही भरकटत गेल्यानेतिच्या कुटुंबाची वाताहात झाली होती..क्षणीक सुखासाठी तिने नवऱ्या ऐवजी प्रियकरला अंगावर घेतल्याने या संबंधाचा शेवट असा झाला होता.

09 TO 15 NOV 2020 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 07/11/2020 8:39 PM Page 1



# जबरी चोरीचा बनाव करणारा चालकाला पोलिसांनी केले जेरबंद

**यवतमाळ/प्रतिनिधी**

अडचणीत असलेल्या व्यक्तीला कधीकधी चुकीची बुद्धी सुचते. त्यामुळे तो जास्त अडचणीत येतो. असाच काहीसा प्रकार एका आयशर टेम्पो चालकाच्या बाबतीत घडला. मालकाला देण्यासाठी व्यापाऱ्यांकडून घेतलेले आठ लाखाची रोकड बघून त्याने लुटीचा बनाव केला. मात्र तपासाअंती त्याने बनावट कथानक सादर केल्याचे उघड झाले. त्यामुळे आधीच अडचणीत असलेला वाहनचालक जास्त अडचणीत आला. यवतमाळ ग्रामीण पोलिस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त कामगिरीमुळे हा प्रकार उघडकीस आला व मुळ मालकाचे आठ लाख रुपये देखील वाचले.



वरुड जिल्हा अमरावती येथील कृष्णा ट्रेडर्स या फर्मचे मालक पवन गांधी असुन त्यांच्या मालकीचा आयशर टेम्पो आहे. त्यांच्या आयशर टेम्पो (एमएच २७ बीएक्स ६४६५) यावर फैसल खान महेमूद खान हा गेल्या दोन वर्षापासून चालकाचे काम करत होता. ३ नोव्हेंबर रोजी दुपारी वाहन चालक फैसल खान टेम्पोने १० टन मका व आठ लाख रुपये रोख आर्वी येथून घेवून निघाला होता. आठ लाख रुपयांची रोकड हाती पडल्यानंतर फैसल खान याचे मन सैरभैर झाले. रात्री सव्वा सात वाजता त्याने मालक गांधी यांना फोन करुन खोटे सांगितले की करळगाव घाटात दोन दुचाकीवर आलेल्या चौघा जणांनी वाहनावर दगडफेक करुन आपल्याजवळ असलेली आठ लाखाची रोकड लुटली आहे. मालक गांधी यांनी याप्रकरणी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार तपास सुरु करण्यात आला. रस्तालुटीचा प्रकार झाल्याची माहिती मिळाल्याने पोलिस अधिक्षक डॉ खंडेराव धरणे यांनी हा प्रकार गांभीर्याने घेतला. पोलिस उप विभागीय अधिकारी कु.माधुरी बाविस्कर, स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. प्रदिप शिरस्कर, ग्रामिण पोलिस स्टेशनचे स.पो.नि. गजानन करेवाड यांनी वाहन चालकाने कथन केलेल्या ठिकाणी आपल्या पथकासह भेट दिली. वाहन चालक कथन करत असलेली माहिती आणि तेथील वाहतूकीसह भौगोलीक परिस्थिती लक्षात घेता हा बनाव असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. अशा घटना या परिसरात यापुर्वी कधी घडलेल्या नव्हत्या. ग्रामिण पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरिक्षक गजानन करेवाड व स्थानिक गुन्हे शाखेचे स.पो.नि. विनोद चव्हाण यांनी वाहन चालकाकडे कसून चौकशी केली असता हा घटनाक्रम बनावट असल्याचे निष्पन्न होत गेले. वाहन मालक व व्यापारी पवन गांधी यांनी वाहन चालका विरोधात ग्रामीण पोलिस स्टेशनला लेखी तक्रार नोंदवली. वाहन चालकाने कबुल केले की आपल्याला पैशांची निकड असल्यामुळे आपण हा बनाव केला. चौकशी व तपासाअंती त्याने करळगाव घाटात लपवून ठेवलेले आठ लाख रुपये पोलिसांना काढून दिले.

फैसल खान महेमूद खान (२२) वरुड जिल्हा अमरावती यांस यवतमाळ पोलीसांनी अटक केली. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ. दिलीप भूजबळ-पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक डॉ. खंडेराव धरणे, यवतमाळ उपविभागीय पोलीस अधिकारी कु. माधुरी बाविस्कर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पो.नि. प्रदिप शिरस्कर, यवतमाळ ग्रामीण पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरिक्षक गजानन करेवाड,पोलिस हवालदार आडे, पोलिस नाईक मेहत्रे, पोलिस हवालदार प्रेमसिंग, राठोड, पो.ना.विनोद राठोड, पो.कॉ. नेवारे, वाघाडे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे स.पो.नि. चव्हाण, हवालदार डांगे, पोलिस नाईक चव्हाण, पाली, पो.कॉ.सलमान, शेख चालक यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

# म.रा.पत्रकार संघाची सभा उत्साहात संपन्न



**रावेर/हमीद तडवी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ रावेर तालुकाची बैठक आज चिनावल येथे तालुकाध्यक्ष विलास ताठे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संघटन ध्येयधोरणे सभासद वाढवणे व संघातर्फे समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात संदर्भात चर्चा करण्यात आली. यावेळी तालुका भरातील पत्रकार बंधु मोठ्या संख्येने उपस्थित होते. रावेर तालुक्यातील पत्रकार हा केवळ पत्रकार म्हणूनच कार्य करत नाही, तर समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत न्याय मिळवून देण्याचा सतत प्रयत्न करत असतो. यावेळी पत्रकारावर होणारे अन्याय त्याचप्रमाणे समाजात होणारे अनुचित कार्य यास लगाम घालण्याचे कार्य करतो. त्या अनुषंगाने रावेर तालुक्यात नव्याने स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघातर्फे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय देण्याचे कार्य तसेच शेतकरी शेतमजूर नोकरदार या सर्वांसाठी मार्गदर्शक ठरेल. यानुसार पत्रकार संघाचे कार्य करावे व समाजात एक आदर्श निर्माण करावा असा यावेळी ठरवण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष विलास ताठे, उपाध्यक्ष संतोष नवले, कार्याध्यक्ष योगेश सैतवाल, सचिव दिलीप भारंबे, सहसचिव जगदीश चौधरी, तालुका संघटक प्रदीप महाराज, पंजाबी तालुका संघटक विनायक संजय जहुरे, सल्लागार सरदार तडवी, सहसल्लागार संतोष बारी, मनिष चव्हाण, अनिल मानकरे, योगेश पाटील, प्रमोद कोडे, विनोद पाल्हे, सरजू होले, विनोद कोळी, संकेत पाटील, गिरीश नारखेडे, हसन तडवी, सुरेश पवार, गणेश भोई, प्रा.दिलिप सोनवणे, हमीद तडवी हे हजर होते. सदर वेळी प्रास्ताविक दिलिप भारंबे यांनी तर तालुका अध्यक्ष विलास ताठे यांनी मार्गदर्शन केले आभार प्रा.दिलिप सोनवणे यांनी मानले.

# भातशेतीचे नुकसान भरपाई देण्याची कुणबी सेनेची मागणी



**भिवंडी/प्रतिनिधी**

परतीच्या पावसामुळे भिवंडी तालुक्यातील हजारो एकर मध्ये लागवड झालेल्यां भातशेतीचे नुकसान झाल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे शासनाने त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी कुणबी सेना प्रमुख विश्वनाथ पाटील यांनी भिवंडीचे तहसीदार अधिक पाटील यांच्याकडे लेखी निवेदन देऊन केली आहे. यावेळी जिल्हा प्रमुख शरद पाटील, तालुका प्रमुख भगवान सांबरे, उपतालुका प्रमुख संतोष कथोरे, रमेश शेलार, वासुदेव पाटोळे, नरेंद्र पाटील, केशव पाटील, शाम दुपारे, विपुल पाटील, गुरुनाथ शेलार, दिनेश पाटील, कृष्णा पाटील, राजेंद्र विशे, प्रकाश फापे इत्यादी कुणबी सेना इत्यादी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# डॉ.नरेंद्र दाभोलकरांनी दिली माणूसकीला विज्ञानाची जोड - सपोनि रामचंद्र केदार

**अहमदपूर/फिरोज शेख**

समाजातील प्रत्येक मानवाला विज्ञानाची दृष्टी पटवून देत समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी ज्यांनी जिवाची परवा न करात प्रवाहाच्या विरोधात काम केले. अंधश्रद्धा र्निमुलन चळवळीतून माणुसकीला विज्ञानाची जोड देणाऱ्या व्यक्तिमत्व म्हणजे डॉ.नरेंद्र दाभोळकर होय. असे प्रतिपादन अहमदपूर पोलिस ठाण्याचे साहायक पोलिस निरीक्षक रामचंद्र केदार यांनी केले ते शहिद डॉ. नरेंद्र दाभोलकर विचार मंच अहमदपूरच्या वतीने आयोजीत ७५ व्या जयंती विवेक जागर दिनी प्रसंगी बोलत होते.



या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून एस. एम.ससाने, माजी मुख्याध्यापक अजहर बागवान यांची उपस्थिती होती. येथील अंधश्रध्दा निर्मलन चळवळीच्या कार्यकर्त्यांनी कडून शहिद डॉ. नरेंद्र दाभोलकर विचार मंच या कार्यलयात ७५वी जयंती विवेक जागर दिन म्हणून साजरा करण्यात आला. पुढे बोलताना रामचंद्र केदार म्हणाले की २१व्या शतकात देखील समाज जिवनावर अंधश्रद्धेचा पगडा मोठ्या प्रमाणात पावत चाललेला आहे. विज्ञानच्या दृष्टिकोनातून समाजाची प्रगती होत आहे. असे असताना अंधश्रद्धेच्या नावाखाली दोरा, गंडा, करणी-भानामीतच्या नावाखाली भोंदू बाबाकडून सर्वसामान्याची लूट केली जात आहे. आजही अज्ञान बेफिकीरीमुळे भोंदूगिरीचे फावत चालले आहे. आजही अंधश्रद्धेला बळी पडण्याची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. हे थांबवण्यासाठी आपल्या जीवाची आहोती देऊन डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनी कार्य केले. त्यानी जनजागृती, आंदोलने करून सरकारला कायदा करण्यास भाग पाडले. आज त्यांचा कार्याचा वारसा शेकडो कार्यकर्ते मोठ्या जोमाने पुढे घेऊन जात आहेत. आसच डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांचा वारसा आपण सर्वांनी मिळून पुढे घेवून जावू असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. यावेळी भागवत येणगे, चंद्रशेखर भालेराव, फिरोज शेख, राहुल गायकवाड, गोविंद काळे, अॅड सपना गायकवाड, पूजा गायकवाड, संदीप गायकवाड यांची उपस्थीत होते. या कार्यक्रमाची प्रस्तावना मेघराज गायकवाड यांनी केले तर आभार प्राध्यापक रत्नाकर नाळेगावकर यांनी मानले.

## थोडक्यात वृत्तांत

### अॅड. उज्ज्वल निकम यांच्यावर येणार चरित्रपट

मुंबई : जेष्ठ विधीज्ञ अॅड. उज्ज्वल यांनी आपल्या जीवनात आजवरील तिस ३० वर्षाच्या वकीली क्षेत्रात ६२८ आरोपींना जन्मठेप व ३७ आरोपींना फाशीची शिक्षा मिळवून दिली आहे. चरित्रपट अर्थात बायोपिकची चलती असलेल्या काळात आणखी एक बायोपिक प्रेक्षकांसाठी येत आहे. अजमल कसाब सारख्या क्रूरकर्म्याला फाशीची शिक्षा मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे ज्येष्ठ विधिज्ञ अॅड. उज्ज्वल निकम यांच्यावरील चरित्रपट लवकरच झळकणार आहे. दिग्दर्शक उमेश शुक्ला यांनी याबाबत नुकतीच घोषणा केली आहे. उमेश शुक्ला यांनी यापुर्वी 'ओएमजी-ओह माय गॉड', '१०२ नॉट आऊट' या सिनेमांचे दिग्दर्शन केले आहे. अॅड. उज्वल निकम यांच्यावरील चित्रपटाची पटकथा तयार झालेली आहे. सिनेमाची स्टारकास्ट तेवढी ठरायची बाकी आहे. अॅड. उज्ज्वल निकम यांची भूमिका पडद्यावर कोण साकारणार याची मात्र उत्सुकता निर्माण झाली आहे. अॅड.उज्ज्वल निकम यांच्या या चरित्रपटाचे नाव 'निकम' असे राहील. राष्ट्रीय पुरस्कार विजेते लेखक भावेश मंडालिया तसेच गौरव शुक्ला यांनी या चित्रपटाच्या पटकथेचे लेखन केले आहे.



### भिवंडीत शेतकऱ्याची भाताची गंजी पेटवली

भिवंडी : तालुक्यातील कांदळी येथे अजय तुकाराम पष्टे या शेतकऱ्याने खळ्यावर साठवण केलेले भाताची गंजी अज्ञात व्यक्तीने रात्री पेटवून दिल्याने भाताचे मोठे नुकसान झाले आहे. कोरोनानंतर परतीच्या पावसाने नुकसान झाले असल्याने उरले सुरलेले भात पीक साठवणूक करून ठेवलेले असताना तेही अज्ञात इसमाने जाळून टाकल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे घटना माणुसकीला काळिमा फासणारी असून याची सखोल चौकशी करून कारवाईची मागणी करण्यात येत आहे. सदरील माहिती तलाठी कार्यालय यांना देण्यात आली असून लवकरच पंचनामा करून पुढे पाठवण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले आहे.



### देवणी जातीच्या गाईने दिला दोन वासरांना जन्म

देवणी : देवणी तालुक्यातील बोरोळ जवळील शिवाजी नगर तांडा येथे एका देवणी जातीच्या गाईने मंगळवार दि.३ नोव्हेंबर रोजी रात्री दोन वासरांना जन्म दिला आहे. गायीसह दोन्ही वासरे ठणठणीत आहेत. शिवाजीनगर तांडा येथील शेतकरी लक्ष्मण मारोती बालुरे यांच्या गायीने एकाच वेळी दोन वासरांना जन्म दिला. दोन्ही वासरे एकाच रंगाची असून ते तंदुरुस्त आहेत. या आगोदर या गाईने पाच वेळा एकाएकाच वासरांना जन्म दिला आहे. दोन वासरे एकाचवेळी जन्माला येणे ही लाखातील एखादी घटना असते असे वयोवृद्ध व जाणकारांचे मत आहे. जन्माला आलेली दोन्ही वासरांचे वजन एकसमान असून दोन्ही वासरे व गाय सुदृढ व सुखरूप आहेत. सकस आहार, योग्य निगा आणि वेळेवर औषधोपचार या त्रिसूत्रीचा वापर करून केलेले संगोपन आणि तज्ञांच्या सल्ल्याने घेतलेली गाईची गर्भावस्थेतील विशेष काळजी यामुळे ही गाय व दोन्ही वासरे ठणठणीत आहेत.

# वाडा तालुक्यातील गरीबांसाठी पाच रुपयात शिवभोजन

**वाडा/प्रतिनिधी**

कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर गरीब वर्गाची अवस्था अधिकच बिकट झाली असल्याने राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गरीबांना अल्प दारात अन्न उपलब्ध करून देण्यासाठी शिवभोजन थाळीची सुरूवात केली होती. कोरोना काळात ही योजना वाड्यात गणेश मैदान येथे राबविली जात होती. मात्र आता कोरोनाचा प्रभाव कमी झाल्याचे व सरकारी नियमही शिथिल झाल्याने या योजनेची सुरुवात पुन्हा बस स्थानका समोर राबविली जात आहे. गोर, गरीब व मजुरांसाठी अवघ्या पाच रुपयात असलेल्या या थाळीत वरण-भातया, भाजी, चपाती असे मुबलक प्रमाणात जेवण असल्याने दोनशे पेक्षा जात नागरिक दररोज याचा लाभ घेत असल्याची माहिती केंद्र संचालक निकम यांनी देऊन दररोज ही सेवा दुपारी बारा वाजल्यापासून तीन वाजेपर्यंत असल्याचेही सांगितले.





## उच्चतम कृषी उत्तपन्न बाजार समिती लातूर
### ता.लातूर जि. लातूर

- शेतीमाल विक्री झाल्यावर मोजमापानंतर चोविस तासाच्या आत आडत्याकडूनहिशोबाची रक्कम प्राप्त करून घ्यावी. तसे न झाल्यास बाजार समितीकडे तक्रार करा.शेतमाल विक्रीची हिशोबपट्टी सांभाळून ठेवा.
- शेतमाल दराचा अंदाज घेवून शेतमाल विक्रीस आणा. दर कमी झाल्यास तारण योजनेचा लाभ घ्यावा.त्यासाठी बाजार समितीशी संर्पक साधा.
- शेतमाल घरून मोजून, वाळवून व स्वच्छ करून आणा त्यामुळे आपल्या शेतमालास चांगला भाव मिळेल.

**● बाजार समितीचे वैशिष्टये ●**

- १५० एकर जागेमध्ये सुसज्ज अत्याधुनिक बाजार आवाराची उभारणीचे नियोजन
- महाराष्ट्रातील एक अग्रगण्य बाजार पेठ.
- बाजार आवारामध्ये शेतमाल विक्रीसाठी येणाऱ्या शेतकरी बांधवासाठी अल्पदरात पोटभर जेवण्याची व्यवस्था सुरू करण्यात आलेली आहे.
- बाजार आवारातील सर्व घटकांसाठी स्वच्छ पाणी पिण्यासाठी दोन (आर. ओ.) प्लॅन्टची उभारणी केली आहे.
- राष्ट्रीय कृषि बाजार( ई- एनएएम) अंतर्गत लातूर बाजार समितीमध्ये ई- ऑक्शनची सुरूवात केली आहे.
- शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी सतत कटीबध. कडता, धान्याच्या स्वरूपात मात्रे देणे-घेणे बंद
- शेतीमालाची प्रतिवारीनुसार जाहीर लिलावने विक्री,अचक मापतोल व लगेच रक्कम.
- गुळ व भाजीपाल विक्रीसाठी स्वतंत्र आद्यावत मार्केट व नियंत्रणाखाली वेगळा विभाग. यार्ड लगत शेतीउपयोगी वस्तुचे शॉपींग कॉम्पलेक्स.स्वतंत्र कडबा मार्केट वे- ब्रिज व जनावरांचा बाजार
- शेतकरांच्या साईसाठी बाजार समितीचया मुख्य इमारतीमध्ये महाबीज, आरसीएफ व पोष्ट ऑफीस इत्यादी कार्यालय व पार्किंग करीता स्वतंत्र व्यवस्था
- सर्व सोयीयुक्त संस्कृतीक सभागृह. शेतकऱ्यांच्या मूलासाठी अल्पदरात १५० विद्यार्थ्यांची निवासाची सोय
- शेतकऱ्यांना देशभरातील बाजार भावाची दररोज माहीती व्हावी यासाठी दूरदर्शन संच. शेतकऱ्यांना दैनंदिन बाजारभाव माहीतीसाठी एस.एम.एस सेवा. लातूर तालुक्यातील शेतकऱ्यासाठी शेतमाल तारण योजना
- यार्डतील वहातूक सुरळीत होण्याच्या दृष्टीने यार्डत एकेरी वाहतूक चालू करण्यात आली.ग्रामीण भागातील जनवरांना पाणी पिण्यासाठी आ.सी.सी हौद वाटप. तालुक्यातील शेतकऱ्यांना ताडपत्री अल्प दरात उपलब्ध करून देण्यात येत आहे..

**सतिष भोसले** प्रभारी सचिव | **मनोज पाटील** उपसभापती | **ललीतकुमार शहा** सभापती

**भास्कर शिंदे**
प्र.सहा. सचिव

● सर्व संचालक मंडळ ●

सर्वश्री- वैजनाथ शिंदे, संभाजी वायाळ, विक्रम शिंदे, बालप्रसाद बिदादा, सुधीर गोजमगुंडे, तुकाराम आडे, विष्णू मोहीते, गोविंद नरहरे, तात्याराव बेद्रे, हर्षवर्धन सवई, सौ. सुनिता पाटील, सौ. अशाबाई शिंदे व तज्ञ संचालक .

फोन नं. कार्यालयः २४२२५१, सभापती:२४४१०७ , सचिव २४२३७२, फॅक्स : २५४००७

कर्मचारी वृंद उच्चतम कृषि उत्तपन्न बाजार समिती लातूर


# देवणी तालुक्यात तब्बल आठ महिन्यानंतर लाल परी धावली



**ग्रामीण भागातील गाड्या हे येत्या आठ दिवसात संपूर्ण गावांत धावणार आहेत. देवणी ग्रामीण साठी एकच गाडी दिल्याने ते ट्रायल बस दिवसभर १२ गावांना एक फेरा करत आहे. तरी उर्वरित राहीलेल्या गावांना ही लवकरच बस गाड्या सुरू होणार आहेत, अशी माहिती वाहतूक नियत्रंक शिवाजी पाटील यांनी सांगितले.**

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यात एकूण लहान मोठे ५४ गावे असून ५४ गावापैकी १२ गावाना एक फेरा गाड्या चालू झाले आहेत तर दूपारी दोन वाजता एकच गाडी ही सिंधिकामठ, बोरोळ, सय्यदपूर,लासोना गूरनाळ विजयनगर, देवणी (खु) बदनाळ, तळेगाव, चवणहिप्परगा, कानेगाव , बटनपूर अशा गावाना दिवसातून एकच वेळ हे गाड्या धावतात असून तब्बल आठ महिन्यानंतर पहिल्यांदा सोमवार दि.२ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची लाल परी धावल्याने ग्रामस्थांच्या वतीने लाल परिचा स्वागत करण्यात आला. देवणी तालुक्यातील सिमावर्ती भागात मार्च महिन्यात लॉकडाऊन मुळे बस सेवा बंद करण्यात आली. परिणामी प्रवाशांना तथा सर्वसामान्य नागरिकांना कोरोना महामारी काळात व अतिवृष्टीच्या काळात अनेक अडचणींचा सामना करावा लागला. लॉकडाऊन सूरू झाल्यापासून अवैध वाहतूक करणाऱ्या वाहणाकडून पाच किलोमीटरच्या अंतरासाठी विस ते तीस रूपये भाडे घेतले जात असल्याने सर्वसामान्यतून नागरिकांतून ओरड होताना दिसून येते. तरी दिवसातून एक बार होणाऱ्या गाड्या हे पूर्वीच्या वेळापत्रकानूसार गाड्या सोडण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे.

# भिवंडीतील धामणकर नाका उड्डाणपुलावर मोकाट गुरांचा वावर

**भिवंडी/प्रतिनिधी**

शहरात वाहतूक कोंडीची समस्यां मोठ्या प्रमाणात वाढली असतांनाच गुरुवारी दुपारी शहरातील धामणकरनाका उड्डाणपुलावर चक्क मोकाट गुरांनी ठाण मांडल्याने या उड्डाणपुलावर काही वेळासाठी वाहतूक कोंडी झाली होती.



विशेष म्हणजे वाहतूक पोलिसांचे या मोकाटगुरांच्या उड्डाणपुलावरील मुक्त वावराकडे दुर्लक्ष असल्याने प्रवाशांसह वाहन चालक हैराण झाले होते. भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महापालिका प्रशासन व पोलीस यंत्रणेने वेळीच मोकाट गुरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागाईकांमधून केली जात आहे.

09 TO 15 NOV 2020 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 07/11/2020 8:39 PM Page 1



# आज महाराष्ट्र गप्प का?

शिव प्रभूंच्या या महाराष्ट्राने महिलांचा नेहमीच सन्मान केला आहे. त्यांच्यावर झालेल्या अन्यायाच्या विरोधात नेहमीच उभा राहिलेला आहे. कारण अशीच आमची आई असती... असे म्हणत सुभेदाराच्या सुनेला सन्मानाने तिच्या कुटुंबाच्या हवाली करणाऱ्या शिवरायांचा हा महाराष्ट्र आहे. घुसखोर मुस्लिम राज्यकर्त्यांच्या वखवखलेल्या विखारी नजरेतून इथल्या लेकी बाळींना वाचवण्याचे काम शिवराय आणि त्यांच्या मावळ्यांनी केले. पण आज त्याच महाराष्ट्रात एक विधवा महिला तिच्या पतीच्या आत्महत्येला जबाबदार असलेल्या लोकांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी वणवण भटकत आहे. मागील फडणवीस सरकारने तिचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला. पण हे सरकार मात्र तिला न्याय देण्याचा प्रयत्न करीत असतानाच इथले भाजपवाले आरोपीच्या बाजूने उभे राहिलेत. देशाचे गृहमंत्री सुद्धा आरोपीच्या बाजूने बोलत आहेत. अशावेळी महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणसाने न्यायासाठी झगडणाऱ्या आपल्या या विधवा भगिनीला पाठिंबा द्यायला हवा. तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहायला हवे. खास करून शिवसेना आणि मनसे सारख्या मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्यांनी तरी या महिलेला मदत करून तिच्या विरुद्ध आरोपींना मदत करणाऱ्या भाजपवाल्यांना मराठी माणसाची वज्रमूठ दाखवून द्यायला हवी. अर्णब गोस्वामी हा कुठल्याही दृष्टीने पत्रकार वाटत नाही. त्याच्या आचरटपणामुळे मीडियातील चांगल्या आणि खऱ्या पत्रकारांवर मान खाली घालण्याची पाळी आली आहे. म्हणून तर त्याच्या अटकेनंतर महाराष्ट्रातल्या कुठल्याही पत्रकाराने किंवा पत्रकारांच्या संघटनेने आवाज उठवला नाही. आणि अशा फालतू माणसासाठी पत्रकारांनी का आवाज उठवावा? अन्वय नाईक आत्महत्या प्रकरण आणि त्यात अर्णब याला झालेली अटक ही त्याची वैयक्तिक बाब आहे, त्यात इतर पत्रकारांनी का भाग घ्यावा? आणि त्याला जर कायद्याने अटक झाली असेल तर तो पत्रकारितेवरचा हल्ला कसा होऊ शकतो? उद्या एखाद्या पत्रकाराने त्याच्या वैयक्तिक वादातून एखाद्याचा खून केला किंवा पैशाच्या गरजेपोटी कुठे तरी दरोडा टाकला आणि त्या प्रकरणात पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दखल करून त्याला अटक केली, तर अशा गुन्हेगाराला झालेली अटक हा पत्रकारितेवरचा हल्ला आहे असे कसे म्हणता येईल? अर्णब गोस्वामी यांनी अलिबागचे वास्तू विशारद अन्वय नाईक यांचे ८३ लाख बुडवले आणि ही रक्कम काही छोटी नसल्याने एखाद्या माणसाला टेंशन येऊन त्याने आत्महत्या केली असेल व सुसाईट नोटमध्ये त्याने आपण कोणामुळे आत्महत्या केली हे नमूद केले असेल तर त्या माणसाची चौकशी व्हायला नको का? सुशंतचा आत्महत्या प्रकरणात कोणतीही सुसाईट नोट नसताना जर रिया चक्रवर्ती आणि तिच्या कुटुंबीयांची ईडीपासून एनसीबीपर्यंत सर्व तपास यंत्रणांकडून चौकशी होऊ शकते, तर मग सुसाईट नोटमध्ये नाव असतानाही अर्णबची चौकशी होणे यात गैर काय? सुशांत सिंह सारख्या परप्रांतीय नटाच्या आत्महत्या प्रकरणात भाजपवाले धाय मोकलून उर बडवून घेत होते. सरकार आणि पोलिसांवर गंभीर आरोप करीत होते आणि एका मराठी उद्योजकाच्या आत्महत्येविषयी संशय घेऊन आरोपीच्या बाजूने उभे राहत आहेत. त्यांच्या याच दुट्टपी भूमिकेचा महाराष्ट्राला संताप आहे आणि त्याच बरोबर भाजपवाले महाराष्ट्राचे कसे शत्रू आहेत हे सुद्धा दिसून आले. कारण महाराष्ट्राच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या प्रत्येकाची भाजपने पाठराखण केली आहे, मग ती कंगना असो की अर्णब गोस्वामी असो! महाराष्ट्राने या लोकांचे काय घोडे मारले आहे याचा जाब महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणसांनी भाजपवाल्यांना विचारायला हवा, म्हणजे महाराष्ट्रात राहायचे, महाराष्ट्राचे खायचे महाराष्ट्रातील जनतेच्या मतांवराचं राजकारणात मोठे व्हायचे आणि वरून महाराष्ट्रावरच टांगवर करायची हा कृतघ्नपणा या पुढे महाराष्ट्रातील जनतेने सहन करू नये. आज महाराष्ट्रातील मराठी माणसांसाठी लढणाऱ्या शिवसेना आणि मनसे या दोन्ही पक्षांची कसोटी आहे. कारण अन्वय नाईकचे कुटुंब मोठ्या अपेक्षेने त्यांच्याकडे बघतेय, त्यांना या लोकांनी निराश करू नये, त्यांना हर संभव मदत करावी हे त्यांचे केवळ कर्तव्यच नव्हे तर जबाबदारीही आहे. तसेच पत्रकारांनी सुद्धा पत्रकारितेचा धर्म पाळायला हवा. मराठी पत्रकारितेला फार मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. देशात पत्रकारितेचा पाया रोवणारे बाळशास्त्री जांभेकर यांच्या पासून टिळक, आगरकर, चिपळूणकर, खाडीलकर ते शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यापर्यंत अनेक बुद्धिवान पत्रकारांनी महाराष्ट्राच्या हितासाठी आपली लेखणी झिजवली जे महाराष्ट्राच्या हिताच्या आड आले त्यांचे कपडे उतरवून त्यांना तोंड काळे करायला लावले. हा महाराष्ट्रातील पत्रकारितेचा इतिहास आहे. तेंव्हा अर्णब सारख्या भुरट्या आणि मनोरुग्ण माणसाची बाजू घेऊन पत्रकारितेला कलंकित करू नका. उलट पत्रकारितेत शिरलेल्या अर्णबसारख्या वाचाळ आणि विवेकशून्य लोकांच्या विरोधात सच्चा पत्रकारांनी उभे राहायला हवे. आणि पत्रकारिता काय आहे हे समाजाला दाखवून द्यायला हवे. पत्रकारांना कोणताही पक्ष, कोणताही धर्म अथवा कोणताही प्रांत नसतो. त्यामुळे पत्रकार कुठल्याही पक्षाची किंवा धर्माची बाजू घेऊन पत्रकारिता करू शकत नाही. कारण त्यामुळे सत्यावर पडदा टाकला जातो आणि अस्त्याची पाठराखण केली जाते आणि हे पत्रकारितेच्या विरुद्ध आहे. तरीही काही मोठे चॅनलवाले सध्या सत्ताधाऱ्यांच्या मस्तकावर छत्री धरून त्यांच्या मागे मागे फिरत आहेत. त्यामुळे सत्ताधारी म्हणतील ती पूर्व दिशा आणि तेच अंतिम सत्य असे त्यांच्या चॅनल वरून दाखवत आहेत. आणि अर्णब सारख्या सूपरीबाज तर सत्ताधाऱ्यांचे गुलाम बनून त्यांची सेवा करीत आहेत. म्हणून तर त्याच्या अटकेनंतर हा पत्रकारितेवर हल्ला असल्याचा कांगावा केंद्राकडून सुरू झाला. जबाबदार केंद्रीय मंत्री अर्नबच्या समर्थनार्थ पुढे आले. आता काय म्हणावे या लोकांना? सरकारमध्ये बसलेले उच्च पदस्थ लोकच जर अर्णब सारख्या माथेफिरू माणसाच्या पाठीशी उभे राहू लागले, तर या देशातील बोगस पत्रकारितेला एक नवा आत्मविश्वास मिळू शकतो आणि या क्षेत्रात जे सच्चे, बुद्धिवादी पत्रकार आहेत त्यांना हे क्षेत्र सोडण्या वाचून गत्यंतर नाही. अशा स्थितीत अर्णब सारख्या लोकांवर लोकशाहीच्या या चौथ्यास्तंभाची विश्वासार्हता खरोखरच टिकून राहील का? मुळात कुठल्याही क्षेत्रातला माणूस कितीही मोठा असो कायद्या समोर तो इतरांप्रमाणेच सर्वसामान्य असतो. अशावेळी त्याच्यासाठी सरकारमधील जबाबदार मंत्र्यांनी पुढाकार घेणे, त्याची पाठराखण करणे हा एक प्रकारे कायद्याचा अपमान आहे. दुसऱ्याला कायद्याची बुज राखण्याचा उपदेश करायचा आणि स्वतः मात्र कायद्याची पायमल्ली करायची हे आता नेहमीचेच झालेलं आहे. त्यामुळेच समाजातील अपप्रवृत्तींना प्रोत्साहन मिळते आणि देशात गुन्हेगारी वाढते. त्यामुळे हे कुठेतरी थांबायला हवे तरच हा देश आणि या देशातील लोकशाही वाचेल अनायथा कठीण आहे!

# फाईट इज टाईट



जगातील सगळ्यात मोठी लोकशाही अशी बिरुदावली मिरवणाऱ्या अमेरिकेत सध्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीच्या निमित्ताने लोकशाहीचा जो तमाशा सुरू आहे तो जगभर अमेरिकेची छी.. थू.. करणारा ठरत आहे. कारण राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत घोटाळा झाला असा आरोप करीत विद्यमान राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी संपूर्ण निकाल यायच्या आधीच न्यायालयात धाव घेतली आणि उशिरा आलेल्या पोस्टल मतांची मोजणी करू नये अशी मागणी केली. कारण निवडणुकीचे कल त्यांच्या विरूद्ध जात असल्याचे दिसताच त्यांना ही लोकशाहीची हत्या असल्याचा साक्षात्कार झालाय आणि त्यांनी जो तमाशा सुरू केलाय तो अमेरिकेच्या लोकशाही परंपरेला काळीमा फासणारा आहे. राष्ट्राध्यक्ष पदाच्या या निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार जो बायडन यांचा विजय दृष्टिपथात आहे. कारण त्यांना २६४ मते मिळाली आहेत. तर ट्रम्प यांना २१४ विजयासाठी २७० चा आकडा गाठण्यापासून जो बायडन अवघे ६ पावले दूर असतानाच या निवडणुकीचा खेळखांडोबा करण्यासाठी ट्रम्प न्यायालयात गेले. पण आतापर्यंत दोन जिल्हा न्यायालयांनी त्यांची याचिका फेटाळली आहे. त्यामुळे ते वरच्या कोर्टात जातील तोवर संपूर्ण निकाल आलेला असेल. पण विजयी झालेल्या जो बायडन यांचा व्हाइट हाऊस मध्ये जाण्याचा मार्ग रोखण्यासाठी ट्रम्प आता न्यायालयाचा आधार घेत आहेत. ही निवडणूक प्रक्रिया सहाजा सहजी पूर्ण होईल असे वाटत नाही. मात्र ट्रम्प यांच्या आततायीपणामुळे अमेरिकन जनतेच्या डोक्याचा ताप मात्र वाढला आहे. तरी नशीब भारतासारखे खंडीभर पक्ष अमेरिकेत नाहीत. नाही तर ट्रम्प यांनी सगळ्यांना विकत घेऊन सत्ता राखली असती. कारण ते फार मोठे उद्योगपती आहेत आणि एक हॉटेल व्यावसायिक ते राजकारणी या प्रवासात त्यांनी अनेक झोल झपाटे केले आहेत. चारित्र्याच्या बाबतीत तर त्यांनी आसाराम बापू यांनाही मागे टाकले आहे. त्यामुळे अशा माणसाला नेहमीच सत्तेची हाव असते. कारण सत्तेचा प्रभावाखाली सगळी अनैतिकता झाकली जाते हा आजवरचा इतिहास आहे. ट्रम्प यांना सुद्धा असाच इतिहास घडवायचा होता, पण अमेरिकेतील सुजाण नागरिकांनी यावेळी त्यांना नाकारले आणि जो बायडन यांना संधी दिली. अमेरिकेतील लोकशाही व्यवस्था भारतापेक्षा थोडी वेगळी आहे. तिथे हाऊस ऑफ रिप्रेझेटीव्ह आणि सिनेट अशी दोन सदने आहेत. पण राष्ट्राध्यक्ष मात्र जनतेतून निवडला जातो आणि त्यासाठी अमेरिकेतील जवळपास ५० राज्य मतदान करतात. बरे या मतदानाची पद्धत जरी काहीशी भारतासारखी असली तरी मतांच्या मूल्यांकनामुळे जास्त मते मिळवणारा सुद्धा पराभूत होतो. मागील निवडणुकीत हिलरी क्लिंटन यांचेही तसेच झाले होते. येथे इलेक्ट्रोकल मतांचे अधिक महत्त्व आहे आणि प्रत्येक राज्याच्या लोकसंख्येच्या आधारावर इलेक्ट्रोकल मतांचे मूल्यांकन केले जाते आणि त्यांची संख्या ५३८ इतकी आहे. त्यापैकी विजयी उमेदवाराला २७० मते मिळायला हवीत. मात्र या निवडणुकीत ट्रम्प यांच्या मतांचा आलेख खाली आला आणि त्यांचे काऊनडाऊन सुरू झाले आणि त्याची अनेक कारणे आहेत. ट्रम्प यांनी आपल्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या ४ वर्षांच्या कारकिर्दीत बालिशपणाचा कळस केला आणि आपल्या वाचाळपणामुळे राष्ट्राध्यक्ष पदाची शान घालवली, असा तिथल्या राजकीय पक्षांचा आरोप आहे. ज्या रिपब्लिकन पक्षाने जॉर्ज बुश, रोनाल्ड रिगण, रिचर्ड निक्सन यांच्या सारखे कर्तृत्ववान राष्ट्राध्यक्ष दिले त्याच रिपब्लिकन पक्षावर ट्रम्प यांच्या सारख्या व्यापाऱ्याला स्विकारण्याची पाळी का आली हा एक स्वतंत्र चर्चेचा विषय आहे.

**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

त्यामुळे अमेरिकेत सत्तांतर होणार ही काळ्या दगडावरची रेष होती. त्याच बरोबर ट्रम्प सहजासहजी खुर्ची सोडणार नाहीत याचीही अमेरिकन जनतेला जाणीव होती आणि त्यामुळेच यावेळी राष्ट्राध्यक्ष निवडणुकीचा तमाशा झाला जो अमेरिकेच्या प्रतिष्ठेला शोभणारा नव्हता. अर्थात अमेरिकेत कोणाची ही सत्ता येवो भारताला फारसा फरक पडणार नाही, याचे कारण अमेरिकेचे व्यापारी धोरण! त्यामुळे निवडणूक जिंकण्यासाठी भलेही ट्रम्प यांनी चीन बरोबरचे व्यापारी संबंध तोडून चीनच्या विरोधकांना खुश केलेले असले तरी चीन आणि अमेरिका यांच्यातील व्यापारी संबंध हे दोन्ही देशांचा आर्थिक कणा असल्याने ते पुन्हा प्रस्थापित होऊ शकतात. आता जो बायडन सत्तेवर येताच सर्वांत प्रथम अमेरिका आणि चीन यांच्यातला तणाव कमी करण्याचा प्रयत्न करतील, अर्थात ते जगाच्या दृष्टीने चांगलेच आहे. कारण ट्रम्प यांनी चीन बाबत जी टोकाची भूमिका घेतली होती, त्यामुळे जगाला तिसऱ्या महायुद्धाचा धोका होता. मात्र अमेरिकेत आता सत्तापरिवर्तन होत असल्याने जो बायडन हाँकाँग आणि तैवान बाबत कोणती भूमिका घेतात याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. पण हा सगळा नंतरचा भाग आहे. सध्या अमेरिकन राष्ट्राध्यक्ष पदाची निवडणूक ट्रम्प यांच्या मुळे कायद्याच्या कचाट्यात सापडण्याची शक्यता आहे. त्यामुळे जो बायडन जरी जिंकले तरी न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होऊन त्यांना व्हाइट हाऊस मध्ये पोहचण्यास वेळ लागू शकतो. शिवाय ते जरी राष्ट्राध्यक्ष झाले तरी हाऊस ऑफ रिप्रेझेटिव्ह सभागृहात रिपब्लिकन पक्षाचे वर्चस्व आहे. त्यामुळे त्यांचा राष्ट्राध्यक्ष पदाचा कार्यकाळ हा एक प्रकारचा अग्निपथच असेल. कारण एकीकडे कोरोनामुळे डबघाईस आलेली अमेरिकन अर्थव्यवस्था आणि दुसरीकडे जागतिक पातळीवर चीन सारख्या मोठ्या व्यापारी देशाशी बिघडलेले आर्थिक संबंध या दोन्ही आघाड्यांवर जो बायडन कसे आणि कितपत यशस्वी होतील, यावरच त्यांच्या कारकीर्दीचा यश अपयश अवलंबून आहे.

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# कृषी कायद्यांच्या चिकित्सेची चिकित्सा



केंद्र सरकारने तीन नवे कृषी कायदे आणले आणि त्यावर गदारोळ सुरू झाला. तो विरोध आता रस्त्यावर उतरला. शेतकरी संभ्रमित झाला की या कायद्याने नेमके माझ्या वर काय परिणाम होणार आहेत. या कायद्याने शेतकऱ्याचा फायदा होणार की नुकसान, याचा विचार बहुतांश शेतकरी आणि शेतकऱ्यांची मुलं करत असले पाहिजेत.

शेतकरी पुत्रांनो, हे तिन्ही कायदे इंटरनेटवर उपलब्ध आहेत. याचा विरोध किंवा समर्थन करण्याच्या आधी आपण हे तिन्ही कायदे निदान वाचले पाहिजे, समजून घेतले पाहिजे आणि मग जर तुमची ही खात्री होत असेल की याने शेतकऱ्याचे नुकसान होणार आहे, तर मग याला विरोध करायला हरकत नाही. परंतु कुणीतरी सांगतो म्हणून त्याचा विरोध करणे किंवा कोणीतरी सांगतो म्हणून समर्थन करणे ह्या दोन्ही बाबी सारख्याच चुकीच्या आहेत.

राजकीय पक्ष एकमेकाला विरोध करत असतात. हा विरोध आधी होता, पुढेही चालू राहील. तो योग्य की अयोग्य हा तुम्ही तुमच्या विवेकबुद्धीचा वापर करून ठरवा. महाराष्ट्रात काँग्रेस सत्तेत आहे म्हणून बीजेपी मंदिर उघडा यासाठी आंदोलन करते आहे. या उलट मध्यप्रदेशमध्ये भाजप सत्तेत आहे तेथे मंदिरे उघडा म्हणून काँग्रेस आंदोलन करते. यापैकी कोणत्याही पक्षाला निदान दहावी-बारावीच्या शाळा, एमपीएससी, युपीएससीचे वर्ग, पदवी कॉलेजेस सुरू व्हावे म्हणून आंदोलन करावं वाटलं नाही कारण भावनिक मुद्दे राजकारण्यांच्या सोयीचे असतात म्हणून ते वेळोवेळी त्याला हात घालत असतात.

या विधेयकांना विरोध असलेल्या काही मुद्याची चिकित्सा करू

१.करार शेती हा शेती भांडवलदारांच्या घशात घालण्याचा डाव आहे-

एक लक्षात घ्या, करार शेती प्रत्येकावर बंधनकारक नाही, तर तो शेतकऱ्यांसाठी दिलेला एक पर्याय आहे. आजही प्रत्येक गावांमध्ये, शेतकऱ्याची जी मुलं नोकरीसाठी बाहेर शहरांमध्ये आहे, त्यांची शेती त्यांच्या कुटुंबातला कोणीतरी किंवा जवळचा कोणीतरी वर्षानुवर्षे वाहत आलेला आहे. ही करार शेतीच आहे. आता ही प्रक्रिया कायदेशीर पद्धतीने करता येणार आहे, एवढा यातला फरक आहे. समजा आपली शेती जर आपण एखाद्या कंपनीला करार पद्धतीने दिली तर ते त्याचा मालक होऊ शकत नाही. (sec 8 )

करार शेती किती वर्षासाठी असेल हे ठरवण्याचा अधिकार या कायद्यानुसार शेतकऱ्याला आहे. तो कमीत कमी एक पिकाचा कालावधी असेल, तिथून ते पाच वर्षापर्यंत करता येऊ शकतो. (sec 3.3)

ही शेती हस्तांतरित करण्याचा, विकण्याचा, भाड्याने देण्याचा किंवा मॉर्टगेज (गहाणखत) करण्याचा अधिकार स्पष्टपणे या विधेयकामध्ये नाकारण्यात आलेला आहे (sec 8.a).. जर त्या भाडेपट्टीने घेतलेल्या जमिनीवर एखादे स्ट्रक्चर उभे केले असेल (जसे शेड ) तर तेही तुमच्या एग्रीमेंट पिरेड संपण्याच्या आधी काढून घेण्याचे बंधन कंपनीवर आहे. ते जर त्यांनी काढलं नाही तर करार संपल्यानंतर त्याची मालकी शेतकऱ्याकडे जाते (sec 8 b). नैसर्गिक आपत्तीने जर शेतीचे नुकसान होत असेल (जसे अतिवृष्टी, पूर, टोळधाड) तर अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्याकडून भरपाई वसूल केल्या जाऊ शकत नाही. (Sec 14.2.3)

शेतमालाच्या कराराच्या संबंधांमध्ये शेतमाल घेऊन शेतकऱ्याला कंपनीच्या गेटवर जायची गरज नाही, तर कंपनीने शेतमाल हा शेताच्या बांधावरून उचलावा, असे हा करार सांगतो. ठरलेल्या वेळात शेतमाल उचलणे याची जबाबदारी कंपनीवर दिल्या गेलेली आहे (sec 6.1a). आजही अनेक वेळा आपण बाजार समितीमध्ये बारदाना नाही म्हणून किंवा सुतळी नाही म्हणून शेतमाल मोजून घेण्यास नकार देतात, हे ऐकत आलेलो आहोत परंतु या कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की, शेतमाल उचलण्याची जी पूर्वतयारी आहे, ती करण्याची जबाबदारी कंपनीवर दिलेली आहे आणि अशा कोणत्याही कारणाने शेतमाल घेण्यास नकार देण्याचा अधिकार कंपनीस नाही (sec 6.1.b).

अजून एक उदाहरण लक्षात घ्या, कोणताही शेतकरी असे करणार नाही परंतु समजा एखाद्या शेतकऱ्याने कंपनीसोबत करार केला, त्यांच्याकडून बियाणं घेतली, खते घेतली आणि शेतकऱ्यांने पेरणी केलीच नाही. अशाही परिस्थितीमध्ये शेतकऱ्याकडून नुकसान भरपाई त्याच्या शेतजमिनी मधून करू शकत नाही (sec 15).

करार शेतीने काय साध्य झाले असेल तर सगळ्यात महत्त्वाची एक गोष्ट झाली, ती म्हणजे रिस्क शेअरिंग. करार शेती करायची किंवा नाही, हे शेतकऱ्याने ठरवायचे आहे. ज्यांना करायची नाही, त्यांनी करूच नये पण ज्यांना नवीन वाट निवडायची आहे, त्यांच्यासाठी हा पर्याय नाकारून आपण काय साध्य करणार आहोत?

२.बाजार समित्या बंद करण्याचा डाव आहे आणि आता हमीभाव मिळणार नाही

बाजार समित्यांमध्ये एकूण शेतमालाच्या फक्त ६ टक्के शेतमाल विकल्या जातो. ९४ टक्के शेतमाल हा अजूनही मार्केट कमिटीच्या बाहेरच विकला जातो म्हणून जोपर्यंत हे सहा टक्के शेतकरी बाजार समित्या नाकारत नाहीत, तोपर्यंत बाजार समित्या बंद होऊ शकत नाहीत. २०१६ मध्ये भाजीपाला आणि फळे ही बाजार समितीच्या बाहेर विकण्याचा अधिकार दिला गेला होता त्यानंतर काही सगळाच भाजीपाला हा बाजार समितीच्या बाहेर विकला गेला असे नाही, तर शेतकऱ्यांपुढे एक पर्याय मिळाला आणि त्यामुळे ज्यांना विकायचा होता, त्यांनी बाजार समितीच्या बाहेर भाजीपाला विकला. इतरांनी तो बाजार समितीमध्येच विकला. हे कायदे आल्यानंतर एक-दोन आठवड्यामध्येच रब्बीचा हमीभाव जाहीर झाला. त्यामुळे बाजार समितीच्या बाहेर शेतमाल विकण्याचे स्वातंत्र्य दिल्याबरोबर हमीभाव बंद होणार आहे आणि बाजार समित्या बंद होणार आहे, हे खरे वाटत नाही. अनेक वर्षापासून संत्रा उत्पादक शेतकरी हे संत्रा शेतातूनच (बाजार समितीच्या बाहेर) विकत आलेले आहेत. आता जर संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी आमचा संत्रा बाजार समितीत हमीभावाने विकत घ्या, अशी मागणी केली तर काय परिस्थिती होईल!

३. व्यापारी पैसे देणार नाहीत.

ही मांडणी म्हणजे शेतकरी अगदी साधे भोळे आहेत आणि धान्य विकत घेणारे व्यापारी हे लबाड आणि नालायक आहेत, अशा प्रकारची आहे. जे व्यापारी आपली पत सांभाळत नाहीत, ते बाजारात जास्त दिवस टिकत नाहीत .व्यापाऱ्याला आपली पत असते आणि त्याला ती सांभाळावी लागते आणि म्हणून जे व्यापारी आपला व्यवहार चोख ठेवतात, त्यांच्याच कडे शेतकरी वर्षानुवर्षे आपला शेतमाल विकतात.

कोणत्याही व्यवहारांमध्ये दक्षता बाळगणे गरजेचे असते कारण फसवणूक होऊ शकते. संत्रा विकत असताना काही वेळा असे झाले आहे परंतु नंतर शेतकऱ्यांनी बदल केला. जेव्हा आपला सौदा ठरत असेल तेव्हाच काही रक्कम घ्यायची आणि पूर्ण संत्रा तोडल्यानंतर उचल होईल तेव्हा उर्वरित पैसे घ्यायचे असा एक प्रघात या भागांमध्ये पडला. आपण एका दोषपूर्ण व्यवस्थेतून तुलनेने कमी दोषपूर्ण व्यवस्थेमध्ये जात आहोत आणि ही येणारी नवीन व्यवस्था पूर्ण दोषमुक्त आहे, असं नाही. परंतु यामुळे बाजार समितीच्या बाहेर शेतमाल विकण्याचा अधिकारच असू नये हे ही योग्य नाही.

या कायद्यामध्ये काही त्रुटी आहेत. त्यात सुधारणा करा म्हणून प्रयत्न करताना एखादा पक्ष किंवा संघटना दिसत असेल तर याचे स्वागतच करायला पाहिजे परंतु त्यात त्रुटी आहेत म्हणून हे कायदे नको, हा तर्क पटण्यासारखा नाही. कारण देशाला स्वातंत्र्य देणारा १९४७ चा कायदा एकदम झाला नाही, त्याआधी १९३५ ,१९१९ ,१९०९ असे कायद्याचे काही टप्पे आहेत आणि त्यानंतर स्वातंत्र्याची पहाट उगवली. १९०९, १९१९ या कायद्यांमध्ये अनेक त्रुटी होत्या त्या नंतर आंदोलन करून दुरुस्त करण्यात आल्या. परंतु १९०९ मध्ये जर एखाद्याने ह्या सुधारणेचा कायदाच नको असे म्हटले असते तर १९४७ ला स्वातंत्र्याची पहाट उगवली असती का?

शेतकरीपुत्रांनो हे कायदे झाले म्हणजे एकदम चमत्कार होणार आहे आणि शेतकऱ्याला 'अच्छे दिन' येणार आहे, असं नाही. तर हे शेतकऱ्याच्या स्वातंत्र्याच्या दिशेने पुढे टाकलेले एक पाऊल आहे. ते आपल्या फायद्याचे आहे की नुकसान होणारं आहे हा विचार आपल्याला करायचा आहे आणि मग समर्थन किंवा विरोध हे आपल्या विवेकबुद्धीने ठरवायचं आहे.

**- डॉ. आशिष लोहे**
**वरुड, अमरावती**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# भिवंडीतील कशेळी येथे सापडल्या शिवकालीन ऐतिहासिक तोफा

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी ठाणे मार्गावर असलेल्या कशेळी गावातील मैदानात दोन ऐतिहासिक तोफा रविवारी सापडल्या आहेत. या तोफांमुळे भिवंडीतील इतर गावांप्रमाणेच आता कशेळी गावाला देखील ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले आहे. या तोफा मिळाल्यानंतर तालुक्यातील शिवप्रेमींमध्ये आनंदाची एकच लाट उसळली आहे.

भिवंडी तालुक्यातील शिवप्रेमी व इतिहास अभ्यासक जयकांत शिक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील शिवज्योत संघटनेचे अध्यक्ष रोशन प्रकाश पाटील, पप्पू पाटील, शुभंकर पाटील, उदय पाटील हे तरुण एकत्र येत त्यांनी शिवज्योत परिवार महाराष्ट्र राज्य हि संघटना स्थापन केली आहे. आज या संघटनेचे ८०हून अधिक सभासद आहेत. शिवकालीन गड किल्यांचा इतिहास तरुणांसह नागरिकांना माहित व्हावा तसेच ऐतिहासिक गड किल्ल्यांची नागरिकांना माहिती व्हावी यासाठी हि संघटना काम करते. ठाणे जिल्हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झाला असल्याने या जिल्ह्याला ऐतिहासिक वारसा आहे.

## शिवप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण!





छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेमाखातर शिवज्योत संघटनेचे तरुण जिल्ह्यासह राज्यातील गड किल्यांच्या संवर्धनासाठी कार्यरत आहेत. भिवंडीतील कशेळी येथील मैदानाच्या मोकळ्या जागेत ऐतिहासिक तोफा असल्याची माहिती इतिहास अभ्यासक जयकांत शिक्रे यांच्या अभ्यासात तसेच रोशन पाटील यांना चर्चेतून माहिती मिळाली होती.शिवज्योतच्या सभासदांनी मागील पंधरा दिवसांपासून कशेळी येथे ऐतिहासिक वस्तूंचा शोध घेण्यास सुरुवात केली असता रविवारी कशेळी येथील छ.शिवाजी महाराज क्रीडांगण येथे असलेल्या दत्त मंदिर व स्मशान भूमीच्या बाजूला सुरुवातीला एक तोफ आढळली. शिवज्योतच्या सभासदांनी अगोदर स्वतः च्या हातांनी व श्रमदानाने हि तोफ बाहेर काढण्यासाठी सकाळी आठ वाजल्यापासून सुरुवात केली होती. हे खोदकाम करतांना शिवज्योतच्या सर्वच सभासदांच्या हाताला अक्षरशः फोड आले होते मात्र छ.शिवाजी महाराजांच्या प्रेमाखातर हे सगळे केल्याची प्रतिक्रिया या सभासदांनी दिली आहे. दरम्यान तोफा मोठ्या व मातीत खोलवर असल्याने शेवटी जेसीबी मशीनच्या सहाय्याने दोन तोफा बाहेर काढण्यात आल्या आहेत. तोफा बाहेर निघताच शिवप्रेमींनी एकच जल्लोष साजरा केला.

या तोफा ब्रिटिश कालीन असून तोफांवर १७९८ ते १८११ असा उल्लेख असून तोफांवर ब्रिटिश राजमुकुट असल्याने या ब्रिटिश कालीन तोफा असाव्यात ज्यांची लांबी ९ फूट २ इंच व दुसऱ्या तोफेची लांबी ९ फूट ३ इंच आहे. त्यामुळे तोफांची लांबी आणि त्यावरील ब्रिटिशकालीन नोंद यामुळे या तोफा ब्रिटिशकालीन असाव्यात तसेच या ठिकाणी आणखी चार तोफा अजून आहेत असा अंदाज शिवज्योतचे मार्गदर्शक व इतिहास अभ्यासक जयकांत शिक्रे यांनी प्रतिक्रिया देतांना व्यक्त केली आहे. गावातील लोक पुरातन खांब म्हणून या तोफांचा उल्लेख करत होते. मात्र हे लोखंडी खांब इतिहासाचे पुरावे असल्याची खात्री पटल्यानंतर शिवप्रेमी शिक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही शोध मोहीम सुरू केली असता या तोफा मिळाल्या ज्याचा आम्हला अभिमान आहे अशी प्रतिक्रिया शिवज्योत परिवार संघटनेचे अध्यक्ष रोशन पाटील यांनी दिली आहे.

# एसटीच्या नाथजल शुद्धपेयजल योजनेचे परिवहनमंत्री अनिल परब यांच्या हस्ते उद्घाटन




**मुंबई/प्रतिनिधी**

एसटीच्या लाखो प्रवाशांना स्वस्त दरात, दर्जेदार शुद्ध पाणी मिळावे या उद्देशाने 'नाथजल' शुद्ध पेयजल योजनेचे उद्घाटन परिवहन मंत्री व एस.टी महामंडळाचे अध्यक्ष ॲड. अनिल परब यांच्या हस्ते आज करण्यात आले. परब म्हणाले, या योजनेअंतर्गत महामंडळाच्या प्रत्येक बस स्थानकावर महामंडळाचे अधिकृत बाटली बंद पेयजल उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची महान परंपरा लाभली आहे त्या वारकरी संप्रदायामध्ये आपल्या गुरूला 'नाथ' या नावाने संबोधले जाते त्यांच्या आदराप्रित्यर्थ एसटीच्या अधिकृत बाटलीबंद पेयजलास 'नाथजल' हे नाव देण्यात आले आहे. टप्याटप्याने राज्यातील सर्व बसस्थानकावर 'नाथजल' हे एसटी महामंडळाचे अधिकृत पेयजल उपलब्ध होणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना किफायतशीर दरामध्ये दर्जेदार शुद्ध पेयजल एसटी महामंडळाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असेही परब यांनी सांगितले. संपूर्ण राज्यात बाटलीबंद पाणी पुरविण्यासाठी मे.शेळके बेव्हरेजेस प्रा.लि. पुणे (Oxycool) या संस्थेची निवड करण्यात आली असून, सर्व बस स्थानकावर ६५० मिलीमीटर व १ लिटर बाटलीबंद स्वरूपामध्ये हे 'नाथजल' विक्रीसाठी उपलब्ध असणार आहे. यांचा दर अनुक्रमे १० रुपये व १५ रुपये इतका असेल, अशी माहिती एस.टी. महामंडळाकडून देण्यात आली आहे. या कार्यक्रमाला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अविनाश ढाकणे, मे.शेळके बेव्हरजेस प्रा.लि. पुणे (Oxycool) या संस्थेचे अध्यक्ष निलेश शेळके व महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# बसपा नालासोपारा विधानसभा अध्यक्षपदी नासिर शेख यांची नियुक्ती

**वसई/प्रतिनिधी**

वसई-विरार शहर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकी संदर्भात शनिवार २४ ऑक्टोंबर रोजी बहुजन समाज पार्टी कार्यकर्त्यांची मिटिंग पार पडली. सदरची मीटिंग चंदनसार येथील पक्षाच्या विभागीय कार्यालयात वसई-विरार शहर जिल्हाध्यक्ष नितीन जाधव यांनी आयोजित केली होती. त्यावेळी नासिर हसन शेख यांना नालासोपारा विधानसभेच्या अध्यक्ष पदी तर सलमान शेख यांना विरार शहर अध्यक्ष पदी नियुक्त करण्यात आले. यावेळी जिल्हा संघटक प्रा. डी.एन. खरे यांनी वसई-विरार शहर महापालिकेत नगरसेवक निवडून पाठविण्याचा संकल्प व्यक्त केला. वसई-विरार शहर महापालिकेची निवडणूक पूर्ण ताकतीनिशी लढण्यासाठी ताबीज शेख सुनील फाटे, परवेज शेख, इब्राहिम शेख, लखन सुळे, राहुल अहिरे,



नईम भाई इद्रीसी, सुलतान इद्रीसी सलीम शेख, जीशान शेख, बंटी धांडे, असलम सवालाखे, मायकल डिसोजा इत्यादी कार्यकर्त्यांनी उपस्थिती दाखवून इच्छा व्यक्त केली.

# वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंदे वाल्यांच्या मुसक्या आवळणार -सहा.पोलीस निरीक्षक अतुल भोसले

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंदे वाल्याच्या मुसक्या आवळणार, हातभट्टी दारू, मटका, जुगार, गुटखा वाल्यावर कारवाई करण्यात येणार असून व परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार, अवैध धंदे वाल्यांना पाठीशी घालणार नाही असे वळसंग पोलीस ठाण्याचे नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी 'क्राईम संध्या'चे सोलापूर जिल्हा प्रतिनिधी इरप्पा बोरीकरजगी यांच्याशी वार्तालाप प्रसंगी माहिती दिली. तत्कालीन कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक शिरीष माणगांवे यांची बदली पुणे ग्रामीणला झाली असून त्यांच्या जागी अतुल भोसले यांची नियुक्ती झाली आहे. त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे व रूजू झाल्यादिवशी कारवाईचा बडगा उगारला आहे. पहिल्याच कारवाईत अवैध धंदे वाल्याचे धाबे दणाणले आहेत. दक्षिण सोलापूर मराठी पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. भोसले पुढे म्हणाले, वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विडी घरकुलमध्ये यापूर्वी कोरोना विषाणू प्रादुर्भाव वाढत असताना तत्कालीन पोलीस अधीक्षक मनोज पाटील यांनी या भागातील कोरोना साखळी तोडण्यासाठी आपली विशेष नियुक्ती केली होती. आपण अथक परिश्रम करून या भागातील कोरोनाची साखळी तोडली होती. या भागातील गुन्हेगारीवर विशेष नियंत्रण ठेवणार आहे. पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन सिमेंट कारखाने, पॉवर ग्रीड, एनटीपीसी, सूत मिल व इतर उद्योग व्यवसाय मोठ्या प्रमाणात असल्यामुळे या भागातील वातावरण चांगले ठेवण्याचा प्रयत्न राहणार आहे. महिलांच्या तक्रारीकडे, शेतकऱ्यांच्या तक्रारी कडे ही जास्त लक्ष केंद्रित केले जाणार आहे. वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंदे सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हातभट्टी दारू, गुटखा, मटका, जुगार, विदेशी डुप्लिकेट दारू ही सर्व धंदे हद्दपार करण्यात येणार आहे. पोलीस स्टेशन



सुशोभित करण्यात येणार आहे. महिलांच्या तक्रारीकडे जास्त प्राधान्य दिली जाणार आहे. नागरिकांना पोलीस ठाणे हे आपलेसे वाटेल असे विधायक उपक्रम आगामी काळात आपण आपल्या सहकाऱ्यांना बरोबर घेऊन करणार असल्याचेही अतुल भोसले यांनी सांगितले.

# वाड्यात डॉ.स्नेहा भोईर यांच्या अत्याधुनिक डेंटल क्लिनिकचे उद्घाटन



**वाडा/प्रतिनिधी**

भिवंडी येथील कोविड सेंटरचे प्रमुख डॉ.नितीन मोकाशी यांच्या हस्ते वाडा येथील वेदांत डेंटल क्लिनिकचे उद्घाटन करून तालुक्यातील अत्याधुनिक डेंटल क्लिनिकचा शुभारंभ केला. वाडा शहरात प्रथमच एम.डी.एस. असलेल्या डेंटिस्टच्या सेवा उपलब्ध होत आहेत ज्यामुळे तालुक्यातील रुग्णांना ठाणे - मुंबई येथे जाणे टाळता येईल. एकदंत डेंटल क्लिनिक हे एक मल्टीस्पेशालिटी डेंटल क्लिनिक असल्याचे मत डॉ. मोकाशी यांनी व्यक्त करून स्नेहा भोईर यांना शुभेच्छा दिल्या.

वाड्यातील ठाकरशी कॉम्प्लेक्स येथील दुसऱ्या मजल्यावर बुधवारी (दि.४) भव्य समारंभात पार पडलेल्या क्लिनिकच्या उद्घाटन प्रसंगी महेंद्र ठाकरे, अनुष्का ठाकरे, अरुण ठाकरे, सुभाष माने यांच्यासह डॉ.भोईर यांचे नातेवाईक व वाड्यातील मान्यवर उपस्थितीत होते.


स्नेह! सौख्य!! साफल्य!!!

## लक्ष्मी अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक लि.,लातूर

LAXMI URBAN CO-OP. BANK LIMITED, LATUR

मुख्य कार्यालय : १६/७, कव्हा रोड, मार्केट यार्ड, लातूर - ४१३५१२
फोन क्र.: (०२३८२) २५१७५३, २५९७५३ फॅक्स क्र. (०२३८२) २५०७५३
ई-मेल : laxmi_urban@yahoo.com वेबसाईट : www.lucbank.in

### "सामाजिक अंतर ठेवूया, कोरोनाला हरवूया"

आमच्या असंख्य सभासद,ग्राहक व हितचिंतकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा...

वैशिष्टये
१. सर्व सामन्यांच्या जिव्हाळ्याची बँक
२. अचूक विनम्र, व तत्पर सेवा
३. सामाजिक बांधलिकी जपणारी बँक
४. अल्प दरात व्यवसायकाना जलद कर्ज सुविधा
५. विविध ठेव योजना व आकर्षक व्याज दर
६. ग्राहकासाठी SMS, ई-मेल स्टेटमेंट सुविधा
७. NEFT / RTGS व NACH सेवा उपलब्ध आहे.
८. Income Tax, GST व ईतर टॅक्स भरण्याची सुविधा
९ अटल पेन्शन योजना (भारत सरकार)
१० लवकरच FAStag,ATM , POS मशीन, BBPS व IMPS सुविधा ग्राहकांच्या सेवेत.

आकर्षक कर्ज योजना
* वैयक्तिक कर्ज योजना
* वाहन कर्ज योजना
* वेअरहाऊस, माल तारण कर्ज योजना
* गृह कर्ज योजना
* पगार तारण कर्ज योजना
* कॅश क्रेडीट कर्ज योजना
* व्यवसाय कर्ज योजना
* मुदती कर्ज योजना
* प्रोफेशनल कर्ज योजना

बँकेच्या एकूण शाखा
* मुख्य शाखा, मार्केट यार्ड, लातूर
* मार्केट यार्ड, जळकोट
* सराफ लाईन, अहमदपूर
* बीड रोड, माजलगाव
* शिवाजी चौक, लातूर
* शिवाजी चौक मुरुड
* शिवपुरी रोड, उमरगा
* जुना मोंढा, नांदेड

-: शुभेच्छूक :-

अशोक श्रीकिशनजी अग्रवाल, चेअरमन | सूर्यप्रकाश मुरलीधरजी धूत, व्हा.चेअरमन | अविनाश भारतराव आळंदकर, प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी

संचालक मंडळ :
शिवप्पा अंकलकोटे, धर्मवीर जाधव, सुरेशचंद्र जैन, लक्ष्मीकांत सोमाणी
अजीतलाल आळंदकर, प्रल्हाद दुडीले, शशिकांत मोरलावार, विजय वर्मा
डॉ.अनिल राठी, सतीष भोसले, रचना ब्रिजवासी, कमलादेवी राठी
माला भुतडा, सुवर्णा पवार
तज्ञ संचालक तेजमल बोरा, तज्ञ संचालक किशोर भराडिया


## वसई-विरार शहर महानगरपालिका

**नवघर माणिकपूर क्षेत्रीय कार्यालय; मुख्य कार्यालय - विरार**

**दुरध्वनी : ०२५० २३३४२५८/२३३४३५४/२३४८१०२**

### जाहीर नोटीस

वसई-विरार शहर महानगरपालिका सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, खालील नमूद मिळकतधारकांनी मालमत्ता हस्तांतरण कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. उक्त फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून सात (७) दिवसांच्या आत लेखी हरकत/तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी सदर हरकत/तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेच विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | नवघर ४/१ | VN09/4367 | विजयकुमार चंदनलाल शर्मा | रमेश मणीलाल वाघेला व मीना रमेश वाघेला |
| २ | नवघर ५/१ | VN12/30548 | मोहिनी आर. सोलंकी | अमि बी. शाह व पूनम अमित शाह |
| ३ | नवघर ५/१ | VN12/30545 | रवींद्रकुमार आर. सोलंकी | अमित बी. शाह व पूनम अमित शाह |
| ४ | नवघर ५/१ | VN12/30565 | दिलीप नटवरलाल शाह | पूनम अमित शाह व अमित बी. शाह |
| ५ | उमेळमान | VN01/53538 | अलिसिया पिटर सराव व ओफिलीया पिटर सराव | ऑल्वीन पॉल फर्नांडिस |
| ६ | नवघर ४/३ | VN11/43276 | सिल्वरशिन इंक्स अँड कोटिंगस प्रा.लि. | विनोदकुमार पंचकलाल शाह व भावना विनोदकुमार शाह |
| ७ | दिवाणमान ४ | VN25/59849 | हिना दिपेश वाघमारे व रेश्मा रमेश पाटील | किरीट वल्लभभाई चुडासमा व रविना किरीट चुडासमा |
| ८ | उमेळमान | VN01/61982/10 | कॉन्स्टन्सिओ फारिया व कुईन्सी फारिया | अभिषेक वामन गुरव व स्वप्ना अभिषेक गुरव |
| ९ | नवघर ४/२ | VN10/46274 | फुलचंद डी. प्रजापती | मनोजकुमार फुलचंद प्रजापती |
| १० | दिवाणमान ४ | VN25/55185 | अनोरा होम्स | सचिन श्रीराम पाटील व श्रीराम भिकाजी पाटील |
| ११ | दिवाणमान ४ | VN25/10036 | जागृती जे धंधुकिया व अंकित जे. धंधुकिया | शैलेश मथुरभाई पाधरा व उषाबेन मथुरभाई पाधरा |
| १२ | दिवाणमान ४ | VN25/55177 | प्रज्ञा राजेश चौधरी | प्रमिला प्रेमचंद मिश्रा व प्रेमचंद बी मिश्रा |
| १३ | नवघर ४/३ | VN11/3716 | गार्डन प्लॉवर्स | चेन्नी पी. थॉमस |
| १४ | दिवाणमान ४ | VN25/5920 | समीर शामसुद्दीन धनानी | कल्पेश नारायण मानकर व किशोर मुकुंद पाटील |
| १५ | बऱ्हामपूर | VN14/45671 | प्रसिला डिसोजा | प्रकाश क्रिसटोफर फेराव |
| १६ | नवघर १/२ | VN04/21585 | प्रमिला डोंगरशी वेद | स्वीडल जॉय डाबरे |
| १७ | माणिकपूर १/१ | VN16/33794/2 | अँड्रीया डेव्हलपर्स व इतर ३ | मर्सेल जेकब मिनेजिस |
| १८ | माणिकपूर १/१ | VN15/619794/26 | शेरॉन डिसोझा व सिल्विन कमिल डिसोझा | सजी थांकाप्पान कुन्नुविल्ला व केझिया सजी कुन्नुविल्ल |
| १९ | दिवाणमान ४ | VN25/10190 | इस्माईल हेल्पींग सोसा | खतीजबाई इस्माईल तेजानी व बदरुद्दीन इस्माईल तेजानी |
| २० | दिवाणमान ६/२ | VN29/15421 | रिचर्ड जॉय मॅथ्यू | किरण दिनेश येळवंडे व नंदा धोडीभाऊ करंडे |

जावक क्र.क.वि./२६२४/२०२०-२१
दिनांक : ०४/११/२०२०

सही/-
मनाली शिंदे
सहा.आयुक्त (प्रभारी)
प्रभाग समिती 'एच'
नवघर-माणिकपूर विभाग
वसई-विरार शहर महानगरपालिका

09 TO 15 NOV 2020 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 07/11/2020 8:37 PM Page 1



# उदगीर येथील फार्म हाऊसवर धाडसी दरोडा चाकूच्या धाकावर लुटले साडेचार लाखांचे दागिने

**उदगीर/प्रतिनिधी**

शहरातील रजीस्ट्री कार्यालयाच्या आवरातून लावलेल्या कारचे काच फोडून लाखो रूपायाची चोरी झाल्याची घटना ताजी आसतानाच शहरालगत असलेल्या बनशेळकी तलावा जवळील जलशुद्धीकरण केंद्राला लागून असलेल्या एका फार्म हाऊसवर सायंकाळी सातच्या सुमारास दोन बुरखाधारी चोरट्यांनी धाडसी दरोडा टाकत साडेचार लाख रुपयांचा ऐवज लूटून नेल्याची घटना घडली आहे. या धाडसी दरोड्यांने शेतवस्ती करून राहणाऱ्या शेतकऱ्यात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.



याबाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेली माहीती अशी की, उदगीर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या बनशेळकी तलावाशेजारी जलशुद्धीकरण केंद्र जवळ असलेल्या सुभाष नेत्रगावकर (वय-७८) यांची शेती असून अनेक वर्षापासून सुभाष नेत्रेगावकर तेथे आरसीसी बाधकाम केलेल्या फार्म हाऊसवर राहतात. गुरुवारी (दि. ५) रोजी सायंकाळी सातच्या सुमारास सुभाष नेत्रगावकर व त्यांची पत्नी प्रभावती नेत्रेगावकर घरी असताना अज्ञात दोन अज्ञात बुरखाधारी चोरट्यांनी घरात प्रवेश केला. त्यांनी नेत्रगावकर यांना चाकू लावला व त्यांच्या बायकोच्या गळ्यातील चार तोळे सोन्याचे गंठण ज्याची किंमत दोन लाख रूपये व पाच तोळे सोन्याच्या हातातील पाटल्या ज्याची किंमत अडीच लाख रूपये असा एकूण साडेचार लाख रुपयांचा ऐवज लुटून चोरटे पसार झाले. ही चोरी केवळ काही मिनीटातच चोरट्यानी घडवून आणली .

याप्रकरणी नेत्रगावकर यांच्या फिर्यादीवरून येथील ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात दोन चोरट्याविरुद्ध दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान लातूर येथून श्वान पथकाला पाचारण करून चोरट्यांचा माग काढण्याचा ग्रामीण पोलिसांनी प्रयत्न केला मात्र श्वान काही अंतरावर जावून घोटमळले. ग्रामीण पोलिसांचे एक पथक आरोपीचा मागोवा घेत आहे. चोरट्यांनी पाळत ठेवून ही चोरी केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे. ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपककुमार वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सपोनि सिंगनकर अधिक तपास करत आहेत. दरम्यान अप्पर पोलीस अधिक्षक हिम्मत जाधव हे उदगीर शहरात गुरुवारी रात्री आठ पासून ठाण मांडून आहेत. उदगीर शहरात दोन दिवसा पुर्वी झालेली धाडसी चोरी व साडेचार लाखाचा पडलेला धाडसी दरोडा यामुळे व्यापरी वर्गात व नागरीकांत भितीचे वातावरण तयार झाले असून पोलिस गस्त वाढविण्याची मागणी जोर घरत आहे.

# दुय्यम निबंधक अधिकाऱ्याला लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक

**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील प्रभारी दुय्यम निबंधक अधिकाऱ्यास वीस हजाराची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी रंगेहाथ अटक केली आहे.



मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार वाड्यातील तक्रारदार बांधकाम व्यावसायिक यांनी बांधलेल्या दत्तात्रय अपार्टमेंट इमारतीमधील गाळा क्र. १० व ११ यांची विक्री करण्यात आली असून त्यांचे रजिस्ट्रेशन करणे बाकी होते सदर गाळ्यांचे रजिस्ट्रेशन करीता वाडा येथील प्रभारी दुय्यम निबंधक सर्जेराव अभिमान चाटे यांनी प्रत्येक गाळ्यांचे १५ हजार रुपये प्रमाणे एकून तीस हजार रूपयांची मागणी केली होती म्हणून तक्रारदार यांनी एसीबी पालघर येथे तक्रार केली असता त्यांचे तक्रारीचे अनुषंगाने बुधवारी (दि.४) तक्रारदार यांना आलोसे यांचे कार्यालयात पंचासोबत पडताळणी करणेकरीता पाठवले असता आलोसे यांनी रजिस्ट्रेशन करीता तक्रारदार यांचेकडे तडजोडी अंती एका गाळ्याचे १० हजार रुपये असे दोन गाळ्यांचे २० हजार रुपये लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्याने शुक्रवारी (दि.६) रात्री ६:४१ वा चे सुमारास तक्रारदार यांचेकडून २० हजार रुपयांची लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वीकारत असताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. हॅश व्हॅल्यू घेण्यात आली असून फोटोग्राफ घेण्यात आले आहेत. सापळा पथक के. एस. हेगाजे पोलीस उप अधिक्षक, भारत साळुंखे पोलीस निरीक्षक, म.पो.ह. मांजरेकर, पो.ह. वा.कदम, पो.ना. सुवारे, पो.ना. सुतार, पो.ना. सुमडा, पो.ना.चव्हाण, म.पो.ना.जाधव, पो.शी. उमतोल, चा.पो.शि. दोडे यांनी कारवाई केली.

पान १ वरून...

## कुणीतरी संधी साधून अचूकपणे...

व्यक्तीचे नाव दत्तात्रय साहेबराव कांबळे (वय ५७, रा. माळवाडी, हडपसर) असे आहे. याबाबत त्यांच्या पत्नीने हडपसर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दत्तात्रय कांबळे यांना दारूचे व्यसन होते. ते बुधवारी दुपारी रात्री दीड वाजण्याच्या सुमारासच घरातून बाहेर पडले होते. रात्रभर ते बेपत्ताच होते. त्याच्या घराच्या आजू बाजूला शेत आहे. गुरुवारी सकाळी एका शेतक-याच्या त्याला कांबळे यांचा मृतदेह आढळला. त्यांनी तात्काळ शंभर नंबरवर फोन करून घटने विषयी माहिती दिली. त्यानुसार कांबळे यांच्या डोक्यात दगड घालून त्यांचा खून केल्याचा प्रकार असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास सुरू असल्याचे हडपसर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक बाळकृष्ण कदम यांनी सांगितले.

## ओळख पाळख नसताना प्रेमाच्या...

याबाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेल माहीती अशी की, लातूर शहरातील एमआयडीसी पोलिस ठाणे हाद्दीत राहणाऱ्या एका ३० वर्षीय विवाहित महिलेला तिच्या मोबाईलवर निनावी नंबरवरून एका तरुणाचा फोन आला. त्या तरुणाने मी तुझा जुना मित्र बोलत असल्याचे सांगीतले. त्याच्याविषयी कुठलीच खातरजमा नकरता विवाहीत महीलेने विश्वास ठेवून संवाद करण्यास सुरूवात केली. पुढे या दोघात वारंवार बोलणे होऊ लागले. काही दिवसातच ओळखूचे रूपांतर प्रेमात झाले. आणी मोबाईवरून प्रेमानंतर लग्नाच्या आणाभाका मोबाईल वर चॅटिंगवर होऊ लागल्या. दरम्यान एके दिवशी सदरील तरुणाने मी रुग्णालयात आहे असे सांगून २००० रुपये फोन पे वर पाठव असा संदेश दिला. तेंव्हा विवाहित महिलेने १६ ऑगस्ट २०२० रोजी २००० रुपये गुगल पे वरून पाठवले. आपल्या प्रेमाच्या जाळ्यात विवाहीता पुरती आडकल्याचे पाहून नंतर त्या तरुणाने एके दिवशी विवाहीत तरूणीला तुझ्या नवऱ्याला तु घटस्फोट दे मी तुला सांभाळतो असा संदेश पाठवला. तसेच पुढे आपल्याला पैसे लागतील असे सांगून भामट्या तरूणाने एक बँकेचे अकाऊट तेंवहा विवाहित तरूणीने आपल्याजवळील सोने विकून २० ऑक्टोबर २०२० रोजी त्या तरुणीने दिलेल्या बँक खात्यावर १ लाख १४ हजार ५०० रुपये जमा केली. रक्कम जमा होता समोरच्या तरुणांनी मी तुझा मित्र नाही मी माझे खरे नाव सांगत नाही असा मेसेज केला व हे प्रकरण तू कोणाला सांगितले तर मी आपल्या दोघातील झालेले चॅटिंग वैयक्तिक संभाषण व्हायरल करेन अशी धमकी दिली. तू पोलिसात गेलीस तर मी तुझ्या वडिलांना येऊन मारहाण करेन अशी धमकी दिली. या संबंधित प्रकरणावर विवाहित महिलेने धाडस करून एमआयडीसी पोलीस ठाणे गाठले व तीने ४ नोव्हेंबर २०२० रोजी एमआयडीसी पोलिसात तक्रार दिली. महीलेने दिलेल्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुरनं ४६५/२० कलम ३५४ (डी), ५०४, ५०६ भादवि व कलम ६६(डी)कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्यासंदर्भात लातूर जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, शहर पोलिस उपअधीक्षक सचिन सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली लातूरच्या सायबर पोलिस विभागाचे पोलिस निरीक्षक नानासाहेब उबाळे तसेच एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजीवन मिरकले व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गणि शेख पोलीस कर्मचारी युवराज गिरी, सायबर सेलचे पोलिस कर्मचारी राजेश कंचे, गणेश साठे यांच्या पथकाने योग्य तपास लावून २४ तासात रुपेश दगडू जाधव (वय २७ रा. म्हाडा कॉलनी, औरंगाबाद )व त्याच्या मित्र अजय शिवराम निलाखे (वय ३१ रा. म्हाडा कॉलनी, धुत हॉस्पिटल समोर औरंगाबाद) या दोघांना बेड्या ठोकून लातुरात आणले. रुपेश जाधव या तरुणाने महिलेने जमा केलेल्या रकमेतून सुझुकी एक्सेस ही स्कुटी खरेदी केली असल्याचे सांगितले. या गुन्ह्यात वापरण्यात आलेला स्कूटी, मोबाईल जप्त करण्यात आला असून या सदर आरोपींकडून भामटेगिरीचे आणखी प्रकरणे उघड होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.या घटनेचा पुढील तपास एमआयडीसी पोलिस करत आहेत.

## कुंपणावरून झालेला वाद प्राणावर ...

दोघांची घरे लगून असून, कुंपणाच्या वादावरून नेहमी दोघांत शाब्दिक बाचाबाची व्हायची. शुक्रवारी सकाळी या दोघांत भांडण झाले. त्याचा वचपा काढण्यासाठी सुधीर जोशीरामवर पाळत ठेवून होता. रात्री जोशीराम घरी येत असताना सुधीरने अंधाराचा फायदा घेत त्याच्या मानेवर कुऱ्हाडीने सपासप वार केले आणि तेथून पसार झाला. जखमी जोशीरामला उपचारासाठी भंडारा येथे नेत असतांना वाटेतच त्याचा मृत्यू झाला. दरम्यान आरोपी सुधीर याला पोलिसांनी अटक केली. तपास गोबरवाहीचे ठाणेदार दीपक पाटील करीत आहेत.

## शरीर सुखाची लालच दाखवून...

गर्भगळीत होतो. ती तरूणी कोण आहे? याची खातरजमा न करता मैत्रीचा हात पुढे करून गोत्यात येतात. नवखी तरूणी जर आपल्यापूढे दोस्तीचा हात स्वत:हून पूढे करत असेल तर कोण मागे हटेल ना? परंतु खरा धोका इथेच असतो. हे ओळखता आले पाहिजे. नाहीतर... भिवंडी शहरात कपड्याची निर्मिती मोठ्या प्रमाणात होते. हे शहर यासाठीच परीचीत आहे या शहरात कपडा व्यापार्यांची सख्या शेकडोच्या घरात आहे.याच शहरातील एका घटनेने भिवंडीत खळबळ माजली होती. याच परिसरातील हायप्रोफाईल सोसायटीत राहणाऱ्या एका महिलेने ४१ वर्षीय व्यक्तीशी टिंडर ॲपवरून मैत्री केली. त्याच्या बरोबर लैंगिक संभाषण करून त्याच्या लैंगिक भावनांना उभारी दिली. दोघांचे चॅटिंगवर बोलणे सुरू झाले. त्यामुळे त्या तरूणाला नविन ओळख झालेल्या तरूणीला भेटण्याची ओढ लागली. यानंतर त्या व्यक्तीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून स्वत:च्या घरी बोलावले. लगट करून त्याला एका खोलीत डांबले. त्यानंतर ४ साथीदारांशी संगनमत करून त्याच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत तिने बँक खात्यातून ३ लाख ८७ हजार तर क्रेडिट कार्डवर २ लाख २० हजार रुपयांचे दागिने व इलेक्ट्रॉनिक वस्तू खरेदी करून ६ लाखांचा गंडा घातल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात त्या व्यक्तीने आरोपी महिलेसह तिच्या ४ अनोखळी साथीदारांवर विविध कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे. दिपाली जैन असं संशयित आरोपी महिलेचं नाव असून तिने मितुल लिबांनी या व्यक्तीला गंडा घातला आहे. भिवंडीतील अरिहंत सिटी या हायप्रोफाईल सोसायटीत दीपाली जैन राहते. तिने काही दिवसांपूर्वी घाटकोपर, मुंबई परिसरात राहणाऱ्या मितुल याच्यासोबत टिंडर ॲपवरून मैत्री करून त्याला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. प्रेमाची भुरळ घालत त्याच्याशी चॅटिंग सुरू केली. नेहमीप्रमाणे २ नोव्हेंबर रोजी आरोपी दिपालीने मोबाइलवर चॅटिंग करून त्याला भिवंडीतील घरी बोलवले. दुपारच्या सुमाराला तो घरी पोहचताच तिने लगट करून त्याला एका खोलीत डांबून ठेवले. यानंतर तिने २ महिला व २ पुरुष साथीदारांना घरी बोलावून मितुल यास मारहाण केली. बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन त्याच्या विविध बँकेतील खात्यात जमा असलेली तीन लाख ८७ हजार रुपयांची रक्कम आरोपी दिपालीने तिच्या बँक खात्यात वळती केली. तसेच मितुलच्या क्रेडिट कार्डवर तिने २ लाख २० हजार रुपयांचे दागिने व इलेक्ट्रॉनिक वस्तू खरेदी करून एकूण सहा लाखांचा डाव साधला. तसेच या प्रकरणाची वाच्यता केल्यास ठार मारण्याची धमकी दिली. विशेष म्हणजे टिंडर ॲप व मोबाइलवरून दिपालीने मितुल यास पाठवलेले सर्व मेसेज डिलीट केले. तसेच बँक व क्रेडिट कार्डवरून त्याच्या मोबाइलवर आलेले मॅसेजही डिलीट केले. याप्रकरणी मितुलने शांतीनगर पोलीस ठाण्यात धाव घेऊन घडलेल्या प्रसंगाचे कथन करताच पोलिसांनी भादवी. कलम ३१४, ३८४, ३८८, ३८९, १२० (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास सह पोलीस निरीक्षक माळी करत आहेत.

## शिक्षिका बस चालकासोबत पळून ...

नात्याचेही बंधन नसते. अशाच प्रकारचे एक प्रेमप्रकरण जळगाव जिल्ह्याच्या जामनेर तालुक्यात उघडकीस आले. भरला संसार सुरु असतांना एक विवाहीत शिक्षिका चक्क स्कुल बस चालकासोबत पळून जाण्याचा व त्याच्यापासून गर्भवती राहिल्याचा प्रकार उघडकीस आला. करिश्मा (काल्पनिक नाव) ही जळगाव जिल्ह्याच्या जामनेर तालुक्यातील एका शाळेत शिक्षिका म्हणून ज्ञानदानाचे काम करत होती. तिला दहा वर्षाचा मुलगा आहे. तिचा पती जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक आहे. अशा प्रकारे या शिक्षीत दाम्पत्याचा संसार सुखाने सुरु होता. परंतू का कुणास ठावूक करिश्माला काय बुद्धी सुचली कोण जाणे? इंग्रजी शाळेत शिक्षिका असलेल्या करिश्माचे त्या शाळेच्या स्कुल बस चालकासोबत सुत जुळले. दहा वर्षाच्या मुलाची आई व शिक्षक पती असतांना देखील तिला स्कुल बस चालक आवडू लागला. एके दिवशी तिने त्या स्कुल बस चालकासोबत पळून जाण्याचा बेत आखला व अमलात देखील आणला. इकडे पत्नी नाहिसी झाल्यामुळे तिच्या पतीने पत्नी हरवल्याची नोंद जामनेर पोलिस स्टेशनला केली. मात्र त्याच शाळेचा स्कुल बस चालक देखील फरार असल्याचे लक्षात आल्यानंतर त्याच्यावर संशय बळावला. स्कुल बस चालकनेच आपल्या पत्नीला फुस लावून पळवून नेल्याप्रकरणी अपहरणाचा गुन्हा नव्याने दाखल करण्यात आला. दोघा प्रेमी युगुलाचा तपास सुरु होता. अखेर वर्षभरानंतर दोघा प्रेमी युगुलाचा शोध लागला. दोघांनी कोकणात लग्न करुन पुण्यात राजा राणीचा नवा संसार थाटला होता. शिक्षीका असलेल्या करिश्माने स्कुल बस चालकासोबत गुल खिलवल्यामुळे ती नऊ महिन्याची गर्भवती देखील झाली. इकडे पती व तिच्या आई, वडिलांनी तिचा शोध लागण्यासाठी थेट मुख्यमंत्री व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचे उंबरठे आणि चपला झिजवल्या. त्यांचा शोध लागला मात्र उपयोग शुन्य झाला. शिक्षीका विवाहीत असली तरी बस चालक अविवाहीत आणि नव्या दमाचा गडी होता. तो तिला आवडला होता. या घटनेची माहिती पोलिस अधिक्षक डॉ. प्रवीण मुंढे यांच्या समोर येताच त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार बकाले यांच्या मदतीने तपास सुरु केला. पाचोरा उपविभागीय अधिकारी ईश्वर कातकडे यांनीदेखील या प्रकरणाच्या तपासकामात स्वत:ला झोकून दिले. त्यात जामनेरचे हवालदार विनोद पाटील, योगेश महाजन, महिला होमगार्ड प्रेमलता पांडे, स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक फौजदार विजय पाटील, दिनेश बडगुजर व नरेंद्र वारुळे आदी यंत्रणा एकाच वेळी कामाला लागल्याने संबंधित चालक व शिक्षिका पुण्यातील उत्तम नगरात वास्तव्याला असल्याचे निष्णन्न झाले. पोलिसांचे एक पथक मंगळवारी तेथे पोहचले तर शिक्षिका नऊ महिन्याची गर्भवती तर चालक हा स्पेअर पार्टच्या दुकानावर कामाला होता. दोघांना ताब्यात घेण्याची तयारी करताच त्यांनी लग्न केल्याचा पुरावा सादर केला व शिक्षिकेने पोलिसांसोबत येण्यास नकार देऊन तसा लेखी जबाब लिहून दिला. दोघंही सज्ञान असल्याने पोलीस माघारी फिरले.

## पोलीस उप निरीक्षक असल्याचे त्याने ...

निष्पन्न झाले. पोलीस उपनिरीक्षक गणेश मोरे या नावाने बनावट फेसबुक अकाउंन्ट तयार करुन त्याद्वारे महिला पोलिसांसोबत फेसबुक वरुन मैत्री करुन त्यांच्याकडून रोख रक्कम उकळणाऱ्या भामटयाला एका महिला पोलिसानेच पकडून पोलिसांच्या स्वाधीन केल्याची घटना उघडकिस आली आहे. मिलींद रमेश देशमुख (२८) असे या भामटयाचे नाव असून कळंबोली पोलिसांनी त्याला फसवणुकिसह इतर कलमाखाली अटक केली आहे. या भामटयाने अनेक महिला पोलिसांकडून व इतर महिलांकडून रोख रक्कम उकळली असल्याची शक्यता असल्याने पोलिसांकडून त्याची कसुन चौकशी करण्यात येत आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेला मिलींद देशमुख या भामटयाने फेसबुकवर पोलिसाच्या युनिफार्ममधील दुसऱ्याच व्यक्तीचा फोटो ठेवून पीएसआय गणेश मोरे या नावाने बनावट फेसबुक अकाऊंट तयार केले होते. त्यानंतर त्याने पोलीस उपनिरीक्षक असल्याचे भासवून अनेक महिला पोलिसांना व इतर महिलांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून त्यांच्याशी मैत्री केली होती. पंधरा दिवसापूर्वी कळंबोलीत रहाणाऱ्या व सध्या मुंबई पोलीस दलात असल्याचे उघड झाले. त्यानुसार सदर भामटयावर गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्यात कार्यरत असलेल्या महिला पोलिसाला देखील त्याने फेसबुकवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठविली होती. सदर फेसबुकवर पोलीस उप निरीक्षकाच्या युनिफार्म वरील फोटो असल्याने महिला पोलिसाने त्याची फ्रेंड रिक्वेस्ट स्विकारली होती. त्यानंतर भामटया मिलींद देशमुख याने या महिला पोलिसाला मसेंजरवरुन संपर्क साधुन त्यांच्याकडून त्यांचा मोबाईल नंबर घेऊन त्यांच्या सोबत बोलण्यास सुरुवात केली. त्यावेळी त्याने, तो पोलीस उप निरीक्षक गणेश मोरे असल्याचे व तो ठाणे पोलीस दलात नेमणुकीला असल्याचे तसेच तो ठाण्यातील कोपरीगांव येथे राहत असल्याचे सांगून या महिला पोलिसावर आपली छाप पाडली होती. त्यानंतर सदर भामटयाने महिला पोलिसाला संपर्क साधून, त्याच्या खिशातील पाकीट पडल्यामुळे तो ठाण्यात अडकुन पडल्याचे सांगितले. तसेच त्याला पैशांची गरज असल्याचे सांगून त्याला पैसे पाठवून देण्यास सांगितले. मात्र त्यावेळी पैसे नसल्याने या महिला पोलिसाने त्याला पैसे पाठविले नाही. मात्र, त्यानंतर दुसऱ्या दिवशी पुन्हा सदर भामटयाने या महिला पोलिसाला संपर्क साधुन त्याला पैशांची गरज असल्याचे सांगून गुगल पेवरुन दहा हजार रुपये पाठविण्यास सांगितले. त्यावेळी महिला पोलिसाने त्याच्यावर विशास ठेवून त्याला गुगल पेवरुन दहा हजार रुपये पाठवून दिले. मात्र, त्यानंतर देखील भामटा मिलिंद देशमुख हा सतत पैसे मागत असल्याने या महिला पोलिसाला त्याच्यावर संशय आला. त्यामुळे त्यांनी त्यांच्या ओळखीतल्या व या भामटयासोबत संपर्कात असेलल्या इतर महिला पोलिसांशी चर्चा केल्यानंतर त्यांनी सुद्धा पीएसआय गणेस मोरे हा त्यांचेशीही फेसबुक व वाट्सएॅपवरुन बोलत असल्याचे तसेच त्यांच्याकडे देखील तो वारंवार पैसे मागत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे गणेश मोरे हा पी.एस.आय असल्याबाबत शंका निर्माण झाल्याने या महिला पोलिसाने त्याला प्रत्यक्ष भेटून खात्री करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार महिला पोलिसाने त्याला भेटण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर त्याने कल्याण रेल्वे स्टेशनवर भेटण्यासाठी बोलावून घेतले. त्यानुसार महिला पोलीस गेल्या असताना, त्या ठिकाणी त्यांना कैलाश शिवराम भांडे नावाचा अनोळखी व्यक्ती भेटला. त्याच्याकडे महिला पोलिसाने अधिक चौकशी केल्यानंतर त्याने त्याच्याजवळ असलेला मोबाईल काढून त्याच्यावर पीएसआय गणेश मोरे या नावाचे फेसबुक खाते दाखविले. तसेच त्यानेच सदरचे फेसबुक खाते तयार केल्याचे व त्याच्यावरुनच तो बोलत असल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर सदर भामटयाने पीएसआय गणेश मोरे या नावाचे बनावट फेसबुक खाते तयार करुन तसेच पोलीस उप निरीक्षक असलेचे खोटे सांगून त्यांची फसवणूक केल्याचे लक्षात आल्यानंतर या महिला पोलिसाने त्याला पकडून कळंबोली पोलिसांच्या स्वाधीन केले. त्यानंतर पोलीसांनी त्याची अधिक चौकशी केली असता, त्याचे नाव कैलाश शिवराम भांडे नसून, त्याचे खरे नाव मिलींद रमेश देशमुख आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश गायकवाड यांनी दिली. या भामटयावर अशाच प्रकारचे गुन्हे दाखल असल्याचेही गायकवाड यांनी सांगितले.

पान ८ वरून...

## गुन्हेगारीच्या समुळ उच्चाटनासाठी ...

पालिका मुख्यालयात सध्या हे आयुक्तालय स्थापन करण्यात आले आहे. परिमंडळ-१ चे पोलीस उपायुक्तांचे कार्यालय मीरा रोड येथे कार्यान्वित करण्यात आले असून, परिमंडळ-२ (वसई) चे कार्यालय वसई पश्चिमेस तर परिमंडळ-३ (विरार) चे कार्यालय एव्हरशाईन सिटी येथील अतिरिक्त पोलीस अधीक्षक कार्यालय येथे ठेवण्यात आले आहे. या व्यतिरिक्त गुन्हे अन्वेषण विभागासाठी एक स्वतंत्र पोलीस उपायुक्त आणि सामान्य प्रशासन विभागासाठी अन्य एक स्वतंत्र पोलीस उपायुक्त नेमण्यात आले आहेत. हे दोन्ही पोलीस उपायुक्त मीरा-भाईंदर येथील आयुक्तालयात तैनात असतील.

सध्या मीरा-भाईंदर पट्ट्यात मीरा रोड, नयानगर, काशीमिरा, भाईंदर, उत्तन आणि नवघर ही सहा पोलीस ठाणी असून लवकरच काशिगांव आणि खारीगांव ही दोन नवीन पोलीस ठाणी स्थापन केली जाणार आहेत. वसई-विरार पट्ट्यात वसई, माणिकपूर, नालासोपारा, विरार, वालीव, अर्नाळा, तुळींज ही सात पोलीस ठाणी कार्यरत असून लवकरच पेल्हार, बोळींज, आचोळे, मांडवी आणि नायगांव ही पाच नवी पोलीस ठाणी स्थापन केली जाणार आहेत. या नव्या सात पोलीस ठाण्यांच्या निर्मितीला राज्य सरकारने परवानगी दिली असून त्यांच्या उभारणीसाठी चार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. दि. १३ सप्टेंबर २०१९च्या शासन निर्णयानुसार, या भागातील पोलिसांचे मनुष्यबळ हे २४८८ वर नेण्यात येणार आहे. यामध्ये, आठ सहाय्यक पोलीस आयुक्त, ४६ पोलीस निरीक्षक, ५९ सहाय्यक पोलीस निरीक्षक, १३२ पोलीस उपनिरीक्षक आणि १९० पोलीस हवालदारांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे, हे पोलीस आयुक्तालय ठाणे, नवी मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, पिंपरी-चिंचवड, नाशिक आणि सोलापूर या पोलीस आयुक्तालयांच्या स्तराचे आहे. येथील पोलीस आयुक्त हे थेट पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक (राज्य) यांना जबाबदार असतील. सध्या या पोलीस आयुक्तालय क्षेत्रात २० पोलीस ठाणी मंजूर असली तरी भविष्यात या पोलीस आयुक्तालयावरील ताण वाढणार आहे. भविष्यात या भागासाठी पोलीस उपायुक्त (वाहतूक) आणि पोलीस उपायुक्त (आर्थिक गुन्हे शाखा/सायबर गुन्हे शाखा) ही दोन नवी पदे निर्माण होऊ शकतात. त्याचप्रमाणे एटीएसचे पोलीस उपायुक्त पदही येथे निर्माण केले जाऊ शकते. त्यामुळे भविष्यात या परिसरास लाभणाऱ्या पोलीस आयुक्तांसमोरील आव्हान हे अधिक मोठे असेल.

मात्र, सध्याची ग्रामीण पोलीस यंत्रणा शहरी स्वरुपात परिवर्तित करताना, शून्यातून हे आयुक्तालय उभे करताना सध्याच्या पोलीस आयुक्तांचे कसब पणाला लागणार आहे. येथील नागरिकांनी अर्थातच पोलीस आयुक्तालयाच्या निर्मितीचे स्वागत केले असून या निमित्ताने या परिसरातील कायदा-सुव्यवस्था मार्गी लागेल, असा विश्वास त्यांना वाटत आहे.

## 'माझा रस्ता माझी जबाबदारी' उपक्रम...

अनेक आंदोलने केली आहेत. गेल्या वर्षी डॉ.नेहा शेख या तरुणीचा या महामार्गावर अपघाती मृत्यू झाल्यावर तरुणांनी आंदोलन करीत या रस्त्यावरील कवाड येथील टोल नाका बंद केला परंतु आजपर्यंतही परिस्थिती बदलली नसून सार्वजनिक बांधकाम विभाग आणि येथील लोकप्रतिनिधीनी याकडे पूर्णपणे दुर्लक्षच केले असल्याने श्रमजीवी संघटनेचे जिल्हा युवा प्रमुख प्रमोद पवार यांनी आणि संपूर्ण महामार्गावरील स्थानिक तरुणांनी एकत्र येऊन बुधवारी युवा क्रांतिकारक स्व. वासुदेव बळवंत फडके यांच्या जन्मदिवशी या महामार्गावरील आपल्या आपल्या गावाशेजारील रस्ता माझा रस्ता माझी जबाबदारी अश्या प्रकारचे आगळेवेगळे धोरण ठरवून श्रमदान करून या महामार्गावरील खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले आहे. आज डाकीवली पुलापासून थेट महापोली गावापर्यंत मालबिडी, महापोली, अंबाडी नाका, पालखाने, वारेट, रेवदी, धोंडवडली दुगाड, इत्यादी भागातील तरुणांनी या भागात साहित्य जमा करून स्वतः कुदळ फावडे हातात घेऊन खड्डे भरले.

यावेळी श्रमजीवी संघटनेचे युवक जिल्हा प्रमुख प्रमोद पवार, भूषण घोडविंदे, असगर पटेल, आर्यन ग्रुपचे कल्पेश (बाळू) जाधव, पालखने माजी सरपंच रमाकांत पाटील,रुपेश जाधव, भुषण जाधव, अकलोली भागातील श्रमजीवी कार्यकर्ते जयेश पाटील, नारायण जोशी, नवनाथ भोये, तसेच महेश ठाकरे, नईम शेख, अल्पेश जाधव, सतीश जाधव, मालबिडीचे सागर डी.जाधव, युवक काँग्रेसचे कल्पेश पाटील, राकेश जाधव, आणि अजय तनपुरे, अंकुश तनपुरे, संजय पाटील ,रामदास पाटील इत्यादी तरुणांनी सहभाग घेतला.

### नाशिक ग्रामीण पोलिसांची धडक कारवाई

# दुचाकी, चारचाकी चोरट्यांसह अवैध शस्त्रधारक अटकेत



**नाशिक/प्रतिनिधी**

नाशिक ग्रामीण पोलिस अधिक्षक सचिन पाटील तसेच मालेगाव कँम्प डीवायएसपी मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मालेगाव छावणी, पेठ आणि पवारवाडी पोलिसांनी आज धडक कारवाई केली. या कारवाईत मालेगाव छावणी व पेठ पोलिस स्टेशनच्या पथकाने दुचाकी व चारचाकी चोरट्यांना मुद्देमालासह अटक केली आहे. पवारवाडी पोलिसांच्या पथकाने गावठी पिस्टल, जिवंत राऊंड या मुद्देमालासह आरोपीस अटक केली आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मालेगाव छावणी पोलिस स्टेशनचे पो.नि.प्रविण वाडीले व त्यांच्या पथकाने मालेगाव शहरातील सराईत व रेकॉर्डवरील गुन्हेगार राकेश संजय कोळी (२३) ओमकार कॉलनी, अयोध्यानगर, सोयगाव ता. मालेगाव तसेच अमजद फकीरा शेख (२४) देवीचा मळा, जिया शेठच्या बंगल्यासमोर मालेगाव या दोघांना शिताफीने ताब्यात घेत अटक करण्यात आली. त्यांच्याकडून चौकशीअंती दोन स्प्लेंडर, दोन होंडा शाईन, तिन एच डिलक्स, एक बजाज डिस्कव्हर, तिन बजाज प्लॅटिना, एक होंडा कंपनीची ड्रीम युगा अशा एकुण बारा दुचाकी हस्तगत करण्यात आल्या. हा मुद्देमाल २,९५,००० किंमतीचा आहे. मालेगाव छावणी पोलिस स्टेशनचे पो.नि. प्रविण वाडीले यांच्या अधिपत्याखाली पो.उ.नि. आर.के.घुगे, पोलिस नाईक वाघ, पो.कॉ. बारहाते, राठोड, नेरपगार, पाटील यांनी ही कारवाई पुर्ण केली.

दुसऱ्या कारवाईत पोलिस अधिक्षक सचिन पाटील व अप्पर पोलिस अधिक्षक शर्मिष्ठा वालावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पेठ पोलीस स्टेशनचे पो.नि. रामेश्वर गाडे पाटील यांच्यासह त्याच्या पथकातील सहायक फौजदार जाडर, पोलिस हवालदार शेखरे, पोलिस नाईक शेख, पो.ना. भुसनर, पो.कॉ. भोये यांनी कारवाई केली. या कारवाईत रेकॉर्डवरील गुन्हेगार सुरज जोंधळे, सादरपाडा ता. पेठ व त्याचे दोघे साथीदार प्रतिक मातेरे, व अनिल धुळे (धारणगाव ता. कोपरगाव) या तिघांना ताब्यात घेत अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून पेठ पोलीस स्टेशन हद्दीत त्यांनी चोरी केलेल्या दोन पिक-अप तसेच एमआयडीसी सिन्नर पोलीस स्टेशन हद्दीतुन चोरी केलेली एक पिक-अप, एक ओमनी व्हॅन व दोन मोटार सायकल तसेच गुन्हा करतांना वापरलेली बोलेरो यासह गाडी तसेच चोरून नेलेली साळ व रुपये ३१०० रोख असा ८,०२,३०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. या माध्यमातून पेठ पोलिस दोन व एमआयडीसी सिन्नर पोलिस स्टेशनचे चार असे एकुण सहा गुन्हे उघडकीस आले आहेत.

तिसऱ्या कारवाईत पवारवाडी पोलीस स्टेशनचे पो.नि. गुलाबराव पाटील यांच्या पथकातील पोलिस हवालदार धारणकर, पोलिस हवालदार बाविस्कर, पो.कॉ. ढामसे, पो.कॉ. भामरे, पो.कॉ. शेलार यांच्या पथकाने पेट्रोलींग दरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे रेकॉर्डवरील हद्दपार गुन्हेगार इब्राहिम अहमद अब्दुल गनीम उर्फ दुरी, नुरनगर रमजानपुरा मालेगाव यास बेकायदेशीर गावठी कट्ट्यासह ताब्यात घेण्यात आले. त्याला अटक करण्यात आली.

# उदगीर येथे रेल्वे स्थानकावर मालधक्का उभारणीसाठी मंजुरी

**देवणी/शकिल मनियार**




उदगीर येथील रेल्वे स्थानकावर मालधक्का व शेड उभारणीसाठी मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे उदगीर येथून धान्य दळणवळणसाठी सुलभता होणार आहे. या मंजुरीसाठी उदगीर रेल्वे संघर्ष समितीने सातत्याने पाठपुरावा केला होता. उदगीर रेल्वे स्थानकावर निजाम काळात मालधक्का व रेल्वे गोडाऊन सुविधा उपलब्ध होती. कालांतराने ती नामशेष झाली. सीमावर्ती भागाशी जोडलेल्या उदगीरची मोठी बाजारपेठ म्हणून ओळख असून मोठ्या प्रमाणात शेतमाल खरेदी विक्री होते. विशेषतः सोयाबीन व तूर या धान्याची मोठी उलाढाल असते. गेल्या अनेक वर्षापासून व्यापारी वर्गाने व उदगीर रेल्वे संघर्ष समितीने मालधक्का उभारण्यासाठी मागणी केली होती. उदगीर रेलवे स्थानकावर यासाठी मुबलक जागाही उपलब्ध आहे.११ नोव्हेंबर २०१९ साली दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री गजानन मल्या उदगीर येथे आले असता व्यापारी, लोकप्रतिनिधी व रेल्वे संघर्ष समीतीने त्यांची भेट घेऊन ही मागणी केली होती.दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाने याची दखल घेऊन ही मंजुरी दिली असून जॉईंट इनसपेक्शन करण्यात आले आहे. २०१४ - १५ साली उदगीर येथून ५ कोटी रुपयांच्या मालाचे दळणवळणही करण्यात आले होते. या निर्णयाचे स्वागत व्यापारी सागर महाजन, कैलास पाटील, बाळकृष्ण मुक्कावार, कैलास पाटील बाजार समितीचे सभापती मुन्ना उर्फ सिद्धेश्वर पाटील, आदींनी केले आहे. या मागणीसाठी उदगीर रेल्वे संघर्ष समितीचे रमेश अंबरखाने, मोतीलाल डोईजोडे, उमाकांत वडजे, विजय पारसेवार, श्रीपाद सिमंतकर आदींनी पुढाकार घेतला. दरम्यान बीओटी तत्वावर शीतगृह व व्यापारी संकुल उभारणीची मागणी उदगीर येथे मंजूर झालेल्या मालधक्का निर्णयाचे उदगीरच्या व्यापाऱ्यांनी स्वागत केले आहे. या स्थानकावर मुबलक जागा उपलब्ध आहे. रेल्वे प्रशासनाने बीओटी तत्वावर शीतगृह व व्यापारी संकुल उभारण्यास मंजुरी द्यावी अशी मागणी केली आहे.

# सोलापूर पोलीस ठाण्यात कोरोना रॅपिड टेस्ट तपासणी शिबीर



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

दैनंदिन कामकाजा करीता जण सामान्यमध्ये सामान्य लोकांसोबत नेहमी पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे संपर्क येत असल्यामुळे पोलीस स्टाफच्या आरोग्याच्या दृश्टीने सोलापूर तालुका पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सुहास जगताप यांनी अधिकारी व कर्मचारी यांच्याकरीता उत्तर सोलापूरचे वैद्यकीय अधिकारी एस.पी. कुलकर्णी यांच्या मदतीने रॅपिड टेस्ट तपासणीचे शिबीराचे आयोजीत केले होते. सदर शिबीरामध्ये सोलापूर तालुका पोलीस स्टेशन, तसेच सायबर पोलीस स्टेशन, सोलापूर ग्रामीण येथील अधिकारी व पोलीस अंमलदाराची असे एकुण ५३ रॅपिड एटीजन तपासणी व १५ आरटीपीसीआर तपासणी करण्यात आली असुन सदर तपासणीमध्ये कोणीही अधिकारी व अंमलदार हे कोव्हीड १९ पॉझीटीव्ह आढळुन आले नाहीत. सदरचे शिबीर हे सोलापूर पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, आरोग्य अधिकारी डॉ. शितलकुमार जाधव, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उप विभागीय पोलीस अधिकारी प्रभाकर शिंदे सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली, सोलापूर तालुका पोलीस ठाणेकडील पोलीस निरीक्षक सुहास जगताप, वैद्यकीय अधिकारी उत्तर सोलापूर एस.पी.कुलकर्णी यांच्या नेतृत्वामध्ये मार्डी ता.उत्तर सोलापूर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. सागर मंगेटकर व त्यांच्या पथकातील कर्मचाऱ्यांनी सोलापूर तालुका पोलीस स्टेशनच्या यशस्वीरित्या आयोजित करण्यात आले होते.

# कायद्याचा बडगा उगारताच घाटी रुग्णालय झाले सुतासारखे सरळ!

**औरंगाबाद/प्रतिनिधी**




घातपात आणि अपघातातील जखमींवर उपचार केल्यानंतर इंज्युरी सर्टीफिकेट देण्यास नेहमीच टाळाटाळ करुन चालढकल करणाऱ्या घाटी रुग्णालयाच्या डॉक्टरांना सीआरपीसी कलम ९१ नुसार पोलिसांनी खरमरीत नोटीस बजावली. या नोटीसीनंतर तेथील डॉक्टरांनी गेल्या एक ते दीड वर्षापासून प्रलंबित असलेली सुमारे दोन हजार प्रमाणपत्रे तपास अधिकाऱ्यांना दिली. घातपात आणि अपघातातील व्यक्तींच्या जखमांवरून गुन्ह्यांचे कलम ठरवले जाते. न्यायालयात चार्जशीट दाखल करताना डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र त्यासाठी गरजेचे असते. मात्र औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयाच्याअपघात विभागातील वैद्यकीय अधिकारी (सीएमओ) रुग्णांना झालेल्या जखमांमुळे आवश्यक असलेले नुकसानीचे दाखले वारंवार चकरा मारुन देखील देत नव्हते. त्यामुळे पोलीस शिपाई त्रस्त झाले होते. या तक्रारी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या कानावर वारंवार पडत होत्या. वैद्यकीय प्रमाणपत्र नसल्यामुळे तपास अधिकाऱ्याला न्यायालयात चार्जशीट दाखल करता येत नव्हते. त्यामुळे साहजीकच प्रलंबित गुन्ह्यांची आकडेवारी वाढत होती. हा प्रकार पोलीस उपायुक्त निकेश खाटमोडे यांच्या लक्षात आला. घाटी पोलीस चौकीने वैद्यकीय प्रमाणपत्र संबंधीत डॉक्टरांकडून घेऊन संबंधित पोलीस स्टेशनला नेऊन देण्यासाठी एका पथकाची नियुक्ती करण्यात आली होती. हे पथक घाटी पोलीस चौकीत नियमितपणे बसून रोजच्या रोज एमएलसीच्या आधारे घाटी रुणलयाच्या डॉक्टरांकडून उपचाराचे प्रमाणपत्र मिळविण्याकामी पाठपुरावा करत होते. परंतु डॉक्टरांकडून काही प्रतिसाद मिळत नव्हता. याकामी चकरा मारणे आणि विनंती करणे मर्यादेच्या बाहेर गेल्यामुळे अखेर वरिष्ठांच्या आदेशानुसार घाटीतील डॉक्टरांना सीआरपीसी कलम ९१ ची नोटीस देण्यात आली. नोटीस बजावताना तुम्हाला पासपोर्ट मिळू देणार नाही, असा गुन्हा दाखल करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. या इशाऱ्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचार केलेल्या घातपात-अपघातांमधील जखमींचे प्रमाणपत्र विनाविलंब देण्यास सुरुवात केली. गेल्या दीड वर्षापासून प्रलंबित प्रमाणपत्रेही हातोहात देण्यत आली. घाटी रुग्णालयात बंधपत्र म्हणून सेवा बजावणे आवश्यक आहे. त्यामुळे येथे काम करणारे डॉक्टर वर्षभर शासकीय नोकरी केल्यानंतर तेथून निघून जातात. त्यानंतर ते त्यांचा मोबाईल नंबर देखील बंद करतात. मात्र, घाटी रुग्णालयात काम करत असतांना त्यांनी घातपात-अपघातांमधील जखमींवर वैद्यकीय उपचार केलेले असतात. न्यायालयात हे प्रकरण गेल्यानंतर समन्स बजावल्यानंतर या डॉक्टरांचा संपर्क होत नाही. त्याचा परिणाम खटल्याच्या कामकाजावर होतो व न्यायालयीन काम खोळंबते. हा प्रकार लक्षात घेतल्यानंतर पोलिस उपायुक्तांनी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडून नोंदणीकृत वैद्यकीय अधिकाऱ्यांची यादी मिळवून त्यांना समन्स बजावण्याचा सपाटा लावला.

# जळगावमध्ये तरुणाच्या खून प्रकरणी पाचही जणांना जन्मठेप



पोलिस उपनिरिक्षक राजेश घोळवे

**जळगाव/प्रतिनिधी**

मद्यपानासाठी पैसे दिले नाही म्हणून जळगाव शहराच्या राजीव गांधी नगरातील एका तरुणाचा सन २०१७ मधे खून करण्यात आला होता. या खुन प्रकरणातील पाचही आरोपींना जळगाव सत्र न्यायालयाने जन्मठेप सुनावली आहे. यात तिन पुरुष व दोन महिलांचा समावेश आहे. राहुल प्रल्हाद सकट या तरुणाला त्याच्या कामाचे वेतन मिळालेले होते. त्याच्याजवळ पैसे सत्यासिंग बावरी याला माहीत होते. राहुल जेवण करत असतांना सत्यासिंग मायासिंग बावरी याने त्याच्याजवळ येवून दारु पिण्यासाठी पैशांची मागणी केली होती. मात्र राहुलने त्याला पैसे देण्यास नकार दिला होता.

या कारणावरुन दोघात शिवीगाळ झाली होती. रात्री दहा वाजेच्या सुमारास सत्यासिंग बावरी व त्याचे भाऊ रवीसिंग बावरी, मलिंगसिंग बावरी, आई मालाबाई बावरी, पत्नी कालीबाई बावरी यांनी मिळून राहुल यास बेदम मारहाण व शिवीगाळ करत जखमी केले होते. राहुलची आई माळसाबाईने या मारहाणील तिव्र विरोध केला होता. त्यावेळी सत्यासिंग व रवीसिंग या दोघांनी मिळून तिला भिंतीवर ढकलून दिल्याने ती जखमी झाली होती. दरम्यान सत्यासिंग याने त्याच्याजवळ असलेल्या धारदार शस्त्राने राहुलच्या पोटात चाकू खुपसून त्याला जखमी केले होते. याप्रकरणी रामानंद नगर पोलीस स्टेशनला भा.द.वि. १४३, १४७, १४८, १४९, ३२३, ३०७, ५०४ मुंबई पोलीस ॲक्ट ३७ (१) (३) चे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा नोंद झाला होता. वैद्यकीय उपचारादरम्यान राहुलचा मृत्यू झाला होता. त्यामुळे खूनाचे कलम वाढवण्यात आले होते. याप्रकरणी ऑक्टोबर २०१७ मध्ये पहिले दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. २६ नोव्हेंबर २०१७ पासून या खुन खटल्याची सुरुवात झाली. या खटल्यात १४ साक्षीदारांची तपासणी झाली. त्यात पोलिस उप निरिक्षक राजेश घोळवे यांचा समावेश होता. अतिरिक्त सत्र न्यायाधीश आर.जे. कट्यारे यांनी पाचही आरोपींना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. आरोपींना जन्मठेपेच्या शिक्षेसह एक हजार रुपयाचा दंड व दंड न भरल्यास तीन महिन्यांची साधी कैद वेगळी भोगावी लागणार आहे. सर्व आरोपी प्रत्येक कलमात दोषी आढळून आले आहेत. सरकार पक्षाकडून ॲड. केतन ढाके तसेच आरोपी पक्षाकडून ॲड. हेमंत सूर्यवंशी, ॲड.केदार भुसारी, ॲड. प्रवीण पांडे यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले. या घटनेनंतर मुख्य संशयित सत्यासिंग फरार झाला होता. रामानंद नगर पोलिस स्टेशनचे तत्कालीन पोलिस उप निरिक्षक राजेश घोळवे यांच्यासह पथकातील प्रदीप चौधरी व शरद पाटील यांनी त्याला अटक केली होती. सत्यासिंग बावरी याच्यावर रामानंद नगर सह जिल्हापेठ व पारोळा पोलिस स्टेशनला दरोड्याचे ३, पोलिसांवर हल्ला केल्याचा १, चोरी, घरफोडीचे ४, दंगलीचे २ व खूनाचा एक असे एकुण १३ गुन्हे दाखल आहेत.

# आदिवासी विकास विभाग मंत्र्यांना विविध योजना त्वरित लागू करण्यासंदर्भात निवेदन



**रावेर/प्रतिनिधी**

रावेर तालुक्यात आदिवासी विकास विभागचे मंत्री के.सी.पाडवी यांना रावेर येथुन आदिवासी एकता मंच तर्फे आदिवासी एकता मंचचे जिल्हा अध्यक्ष सलीम तडवी, राज्य सदस्य नसीर तडवी, सरफराज तडवी, तर महिला जिल्हा अध्यक्ष, हसीना तडवी, बबिता तडवी, लुकमान तडवी, तालुका अध्यक्ष नबाब तडवी आणि सहसचिव जहांगीर तडवी, समीर तडवी यांसह अनेक कार्यकर्ते हजर होते. त्याचबरोबर आदिवासी विकास विभाग मंत्री के.सी.पाडवी यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पेसा क्षेत्रातील आदिवासी गावांमधे शबरी घरकुल योजना ही टार्गेट वाढवुन विशेष पँकेज देण्यात यावे, पेसा क्षेत्रांतील गावांमध्ये जे गाव जोडरस्ते आहेत त्यांना देखील निधी उपलब्ध करुन द्यावा तसेच आदिवासी बांधवांचे रेशनकार्ड विभक्त करुन मिळावे, असे निवदनात म्हटले आहे. आदिवासी एकता मंच कडुन आदिवासी विकास विभाग मंत्री के.सी.पाडवी यांना योजनांबाबतीत निवेदन देतांना आदिवासी एकता मंचेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### भिवंडीत बंद यंत्रमाग कारखान्यास आग, संपूर्ण कारखाना जाळून खाक

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील इदगाह या निवासी विभागातील परिसरात असलेल्या यंत्रमाग कारखान्यास सायंकाळी अचानक भीषण आग लागण्याची घटना घडली. या आगीत संपूर्ण कारखाना जळून खाक झाला असून, आगीचे कारण अद्याप अस्पष्ट असून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशमन दलाची एक गाडी घटनास्थळी दाखल होत ही आग आटोक्यात आणली. अकरम यासीन अंसारी असे कारखाना मालकाचे नाव असून कारखाना बंद असल्याने जीवित तसेच मोठी वित्तहानी टळली आहे.परंतु या आगीने परिसरात एकच घाबराट पसरली होती.

# डुंगे गावातील विकास कामांचे खासदारांच्या हस्ते लोकार्पण

**भिवंडी/अभिजित हिरे**



तालुक्यातील डुंगे ग्रामपंचायतीच्या विविध विकास कामांचे उदघाटन व लोकार्पण भिवंडी लोकसभेचे खासदार कपिल पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी पार पडले. यावेळी जिल्हा परिषदेच्या सभापती सपना राजेंद्र भोईर, पंचायत समितीचे प्रभारी सभापती जितेंद्र डाकी,भाजपचे तालुकाध्यक्ष पी के म्हात्रे, महादेव घाटाळ, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी डॉ.प्रदीप घोरपडे, डुंगे ग्राम पंचायतीच्या सरपंच भारती निलेश भगत, वडघरच्या सरपंच जागृती सोनावणे, माजीसरपंच गणेश पाटील, भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते रामनाथ पाटील, उपसरपंच भावना तरे, सदस्या विजया सचिन भगत, हेमलता कैलास पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. डुंगे ग्राम पंचायतीने राष्ट्रीय पेयजल निधीतून ७२ लाखांची नळ पाणी योजना गावासाठी राबविली असून तिचे उदघाटन तसेच डुंगे गाव स्वागत कमान ते लक्ष्मी नारायण मंदिर पर्यतच्या आरसीसी रस्त्याचे लोकार्पणासह सुमारे इतर चौदा विविध कामांचे लोकार्पण यावेळी खासदार कपिल पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोलतांना गावात विकास कामे करतांना राजकारण करू नये असा सल्ला त्यांनी ग्रामस्थांना दिला असून विकास कामांसाठी केवळ दृष्टी असून चालत नाही तर त्यासाठी दृष्टिकोन असणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीसांच्या काळात आपण २५० कोटींचा निधी भिवंडीच्या ग्रामीण भागासाठी आणला होता, महाविकास आघाडीने किमान ५०० कोटींचा निधी मंजूर करावा व ग्रामीण भिवंडीचा विकास करावा असे आवाहन देखील खासदार पाटील यांनी यावेळी महाविकास आघाडीला याप्रसंगी केले आहे.

### भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे यांची राज्याच्या विमुक्त व भटक्या समितीवर नियुक्ती

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडी ग्रामीण मतदार संघाचे शिवसेनेचे आमदार शांताराम मोरे यांची राज्याच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती या राज्यमंत्री दर्जा असलेल्या समितीवर गुरुवारी नियुक्ती करण्यात आली आहे. आमदार शांताराम मोरे यांची नियुक्ती होताच तालुक्यातील शिवसेना कार्यकर्त्यामध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान आपल्या निस्वार्थ कार्याची दखल पक्षश्रेष्ठी व वरिष्ठांनी घेतली हि माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यासाठी मोठी बाब असून भविष्यात देखील पक्षसंघटना वाढीसाठी व नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहीन अशी प्रतिक्रिया आमदार शांताराम मोरे यांनी दिली आहे.

09 TO 15 NOV 2020 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 07/11/2020 8:41 PM Page 1



## मीरा-भाईंदर परिमंडळात दोन, तर वसई-विरार परिमंडळात पाच नवी पोलीस ठाणी होणार

# गुन्हेगारीच्या समुळ उच्चाटनासाठी मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची भक्कम तटबंदी



वसई/लक्ष्मणराव पाटोळे-पाटील

दीर्घकालीन प्रतीक्षेनंतर मीरा-भाईंदर आणि वसई-विरार या दोन महापालिका क्षेत्रांना मिळून एक संयुक्त पोलीस आयुक्तालय स्थापन झाले आहे. या पट्ट्यातील वाढती लोकसंख्या, वाढते औद्योगिकीकरण आणि त्या अनुषंगाने वाढती गुन्हेगारी लक्षात घेऊन हे पोलीस आयुक्तालय कार्यान्वित झाले आहे. सध्या मीरा-भाईंदर पट्ट्यातील सहा आणि वसई-विरार पट्ट्यातील सात, अशा मिळून तेरा पोलीस ठाण्यांचा कारभार आयुक्तालयातून पाहिला जात आहे. लवकरच नवीन सात पोलीस ठाणी या भागात निर्माण केली जाणार आहेत. सध्याच्या पोलीस दलाचे संख्याबळ हे साडेसहाशे वरून जवळपास अडीच हजारावर (२४८८) नेले जाणार आहे. तसेच पूर्वी या पट्ट्यात दोन अतिरिक्त पोलीस अधीक्षक तैनात होते. आता ही संख्या वाढवून पाचवर नेण्यात आली आहे. नव्या आयुक्तालय क्षेत्रात तीन मीरा रोड, वसई आणि विरार ही तीन परिमंडळं स्थापन करण्यात आली असून, प्रत्येक परिमंडळ हे पोलीस उपायुक्तांच्या अधिपत्याखाली कार्यरत असेल...

### तीन परिमंडळात येणारे पोलीस ठाणे

पोलीस आयुक्त परिमंडळ एक मधील पोलीस ठाणे मीरा-भाईंदर परिसरातील विद्यमान पोलीस ठाणी - मीरा रोड, नयानगर, काशीमिरा, भाईंदर, उत्तन, नवघर पोलीस ठाणे तर नव्याने होणारे काशीगांव, खारीगाव पोलीस ठाणे.

**पोलीस उपायुक्त परिमंडळ २**

वसई, माणिकपूर, नालासोपारा, अर्नाळा पोलीस ठाणे तर नवीन होणारे नायगांव, बोळींज पोलीस ठाणे.

**पोलीस उपायुक्त परिमंडळ ३**

विरार, तुळींज, वालीव पोलीस ठाणे तर नवीन मांडवी, पेल्हार, आचोळे पोलीस ठाणे.

ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर जिल्हा स्थापन झाल्यानंतर ठाणे जिल्हा पोलीस दलाचेही विभाजन करण्यात आले होते. त्याच्याही आधीपासून मीरा-भाईंदर आणि वसई-विरार भागात सागरी आयुक्तालय स्थापन करण्याची मागणी जोर धरू लागली होती. मात्र, त्याकडे तातडीने लक्ष दिले गेले नाही आणि मीरा-भाईंदर शहरी पट्टा हा ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाला जोडण्यात आला होता तर वसई-विरार परिसर हा नव्यानेच स्थापन झालेल्या पालघर जिल्हा पोलिसांकडे वर्ग करण्यात आला होता. विश्वास नांगरे-पाटील हे ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक असताना, त्यांनी सन २०१२ मध्ये राज्य सरकारला पाठवलेल्या अहवालात मीरा-भाईंदर आणि वसई-विरार मिळून एक स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्यात यावे, अशी मागणी केली होती, तसेच या पोलीस आयुक्तालयाचा आयुक्त हा पोलीस उपमहानिरीक्षक स्तरावरील अधिकारी असावा, असे म्हटले होते. मात्र, दरम्यानच्या काळात या पट्ट्यातील लोकसंख्या ही वीस लाखांवरून वाढून ४५ लाखांवर जाऊन पोहोचली. या भागातून बहुचर्चित मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन जाणार आहे. तसेच या पट्ट्यात नजीकच्या भविष्यात उभे राहणारे विरार-अलिबाग कारिडार, मीरा-भाईंदर मेट्रो, मुंबई-वडोदरा एक्सप्रेस वे...आदी महत्त्वाचे प्रकल्प व त्यांची सुरक्षितता लक्षात घेता, येथील पोलीस दलाचे नेतृत्व हे अतिरिक्त पोलीस महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्याकडे देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, या भागास सदानंद दाते साहेब यांच्या रुपाने पहिलेवहिले पोलीस आयुक्त लाभले आहेत. त्यांच्या हाताखाली समन्वयासाठी एक पोलीस उपमहानिरीक्षक नेमण्यात आले आहेत.

मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय वसई अथवा विरार येथे असावे यासाठी येथील लोकप्रतिनिधी आग्रही होते. मात्र, मीरा-भाईंदर पट्ट्याला मुंबईचा लाभलेला शेजार लक्षात घेता, दळणवळणाच्या दृष्टिकोनातून हे मुख्यालय भाईंदर येथे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. येथील जुन्या ...पान ६ वर

### पोलीस आयुक्तालयाची वैशिष्ट्ये

| | |
|---|---|
| सध्याची पोलीस ठाणी | - १३ |
| होऊ घातलेली नवी पोलीस ठाणी | - ०७ |
| पोलीस उपायुक्त | - ०५ |
| सहाय्यक पोलीस आयुक्त | - ०८ |
| पोलीस निरीक्षक | - ४६ |
| सहाय्यक पोलीस निरीक्षक | - ५९ |
| पोलीस उपनिरीक्षक | - १३२ |
| हवालदार | - १९० |
| पोलीस नाईक | - २३० |

## ‘माझा रस्ता माझी जबाबदारी’ उपक्रम; श्रमजीवी कार्यकर्त्यांनी श्रमदानाने भरले भिवंडी-वाडा आणि मनोर महामार्गावरील खड्डे





भिवंडी/अभिजित हिरे

श्रमजीवी संघटनेचे जिल्हा युवक प्रमुख यांनी सोशल मीडियावर आवाहन करून क्रांतिकारक स्व.वासुदेव बळवंत फडके यांच्या जन्मदिनी स्थानिक तरुणांनी एकत्र येऊन बुधवारी माझा रस्ता माझी जबाबदारीहा उपक्रम राबवून हे खड्डे बुजविण्याचे केलेले आवाहन यशस्वी झाले आहे. भिवंडी तालुक्यातील तरुणांनी व श्रमजीवींच्या कार्यकर्त्यांनी पुढे येऊन स्वतः रस्त्यावर उतरून भिवंडी-वाडा, मनोर महामार्गावरील खड्डे श्रमदानाने भरून नवा आदर्श निर्माण करून पुढारी, नेते आणि सार्वजनिक बांधकाम विभागाला चांगलीच चपराक लगावली असल्याचे बोलले जाते.

भिवंडी वाडा महामार्ग हा रस्ता सुरुवातीपासूनच काही ना काही कारणांमुळे वादातच राहिला आहे. या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने या रस्त्यावर सुरुवातीपासूनच खड्डे पडले असून रस्त्याची जबाबदारी असलेल्या संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाचे या महामार्गाकडे पुरता दुर्लक्ष असल्याने संपूर्ण रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडलेले आहेत आणि या जीवघेण्या खडयांमुळे अनेक अपघात होऊन निष्पाप जीव मृत्युमुखी पडले आहेत, तर हजारो नागरिक वाहनचालक आपला जीव मुठीत घेऊन या धोकादायक महामार्गावरून रोज प्रवास करीत आहेत.या महामार्गाच्या विरोधात यापूर्वीही श्रमजीवी संघटना आणि स्थानिक तरुणांनी... पान ६ वर



## उत्कृष्ठ कामगिरीबाबत विरार पोलिसांचे आयुक्तांकडून कौतूक

विरार पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी, चोरीमारी करण्याचे प्रकार वाढले होते. विरार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने चोरट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी एक विशेष मोहिम राबविली. यामध्ये गुन्हा रजिस्टर नंबर ८४८/2000 या गुन्ह्याची मोठ्या शिताफीने तपास करून या गुन्ह्यातील चोरट्याकडून चोरी केलेला माल जप्त करून त्याला जेरबंद केले. या तपासकामी विरार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वराडे व त्यांच्या टीमने ही कामगिरी केली. तमीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्त सदानंद दाते यांच्याकडून विरार पोलिस ठाण्याचे गुन्हे प्रगटीकरण शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल व गुन्ह्याचा तपास करून चोरट्यांकडून १००% मुद्देमाल जप्त करून गुन्हेगाराच्या मुसक्या आवळल्या. या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन आयुक्त साहेबांनी प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा गुणगौरव केला. पोलिसांनी केलेल्या कामाबद्दल वसई तालुक्यातील जनतेकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.









































